फॅमिली ट्रेसिंग बिल्डींग ट्रेसिंगचे नगरसेवकांनी फोन करुन सुध्दा दोन तीन दिवस त्याची दाद घेतली जात नाही. आर.टी.पी.सी.आर. तर सोडून द्या, आर.टी.पी.सी.आर. ला ४-४, ५-५ दिवस लागत आहेत रिपोर्ट यायला. ही आज परिस्थिती आहे ज्याच्यामुळे. आज जे ऐरियाव्हाईज मेडीकल ऑफिसर आहेत आर.टी.पी.सी.आर. त्यांच्याकडे, व्हॅक्सीनेशन त्यांच्याकडे, दुसरा कोणी ओ.पी.डी. आला त्यांच्याकडे कॉन्टॅक्ट ट्रेसिंग त्यांच्याकडे, आज दादासाहेब धर्माधिकारी असुदेत प्रमोद महाजन असुदेत, टेंभा असुदेत आपण आऊट सोर्सिंग करत आहोत. नविन डॉक्टरची नर्सेसची भरती करत आहोत त्यांना आपण व्यवस्थित का युटीलाईज करु शकत नाही? त्यांची मॅन पॉवर. दादासाहेब धर्माधिकारी, प्रमोद महाजन, ते आपण आऊट सोर्सिंग केलेले आहे. तिथले डॉक्टर काय करत आहेत त्यांची टीम कशी आहे नर्सेस ट्रेन आहेत की नाही हा वेगळा संशोधनचा विषय आहे. पण तिथे महापालिकेचा एखादा अधिकारी असु शकत नाही? २४ तास तिथे आपले महापालिका अपॉईंट करु शकत नाही? २४ तास तिथे इनफॉर्मेशन तरी अव्हेलेबल असेल. आज प्रमोद महाजन असुदेत, दादासाहेब धर्माधिकारी असुदेत, टेंभा असुदेत तिथे आपल्यासाठी रेमडेसिवीर आलेली नाही. आयुक्त साहेब याचे उत्तर देतील. प्राईव्हेट हॉस्पीटलला रेमडेसिवीर मला वाटते ८ डोस मिळतील ४ दिवसा नंतर कलेक्टर साहेबांच्या मान्यतेने. आज दादासाहेब धर्माधिकारी किंवा प्रमोद महाजन मधुन पेशंटला सांगितले जाते की रेमडेसिवीर घेऊन या. पेशंट कुठून आणणार ? प्राईव्हेट हॉस्पीटलमध्ये सुध्दा हॉस्पीटलला डायरेक्ट मिळत आहे. परवा तर हाईट झाले मॅडम एका पेशंटला सांगण्यात आले की व्हेंटीलेटर घेऊन या तो कुठून आणणार? दोन वर्षापूर्वी आमच्या कॉंग्रेस परिवारावर अशी वाईट परिस्थिती आलेली आहे आमचे कार्यकर्ते प्रशांत बहूगुणा आर्मी मॅन १७ तारखेला सकाळी १० वाजल्या पासुन आमचे प्रमोद सामंत १०:३० वाजल्या पासुन शहरभर फिरत होते त्यांना हॉस्पीटलमध्ये ॲडमिट करण्यासाठी. शेवटी टेंभा हॉस्पीटलमध्ये रात्री ०८:३० ला पानपट्टे साहेबांना कंटीन्यु फोन करुन त्यांनी कसे तरी आणि जाधव डॉक्टरने ॲडमिट केले. परंतु तिथे व्हेन्टीलेटरची व्यवस्थाच नाही. व्हेंटीलेटरच नव्हता. आणि १८ तारखेला मी फोन केला डॉक्टरला की काय परिस्थिती आहे त्यांनी सांगितले मी राऊंड घेतो आणि सांगतो तुम्हाला फोन करतो. अजुन पर्यंत फोन आलेला नाही. आणि १८ तारखेला तो माणुस गेला. ही परिस्थिती आहे आज हॉस्पीटलची. प्राईव्हेट हॉस्पीटलमध्ये बेड मिळालेले नाही. आपले दादासाहेब धर्माधिकारी असुदेत, प्रमोद महाजन असुदेत गेल्या वर्षभरामध्ये आपण काय शिकलो? आज व्हेंटीलेटरची ऑर्डर आपण का देत आहोत? वर्षभर काय केले? दादासाहेब धर्माधिकारीचे ८४ बेड पडून आहेत. तिथे व्हेंटीलेटर आपल्या जवळ व्हेंटीलेटर नाहीत. ऑक्सीजनची समस्या सुटल्या नंतर व्हेंटीलेटर नाहीत. गेल्या वर्षभरामध्ये ८ हजार रेमडेसिवीर महापालिकेने परचेस केले होते, ते कुठे गेले? काही हॉस्पीटलला उधार तत्वावर दिले होते की त्यांनी ते आपल्याला परत करायचे होते. काही रेमडेसिवीर तर ऑक्टोंबर नोव्हेंबर मध्ये घेतलेले आहेत. तो कुठे खर्च केला? आज रेमडेसिवीर रेमडेसिवीर चालले आहे. मुख्य तुमचे डॉक्टर पडवळ पेपरला स्टेटमेंट देतात की रेमडेसिवीरचा तसा उपयोग नाही. इंजेक्शन साठी पेशंटने पॅनिक होऊ नये. आणि आज परिस्थिती काय आहे? त्यांची गोष्ट खरी पण आहे. पण आज तुमच्या टेंभा असुदेत प्रमोद महाजन असुदेत किंवा दादासाहेब धर्माधिकारी तिथले डॉक्टर लिहून देत आहेत पेशंटच्या नातेवाईकाला रेमडेसिवीर तुम्ही घेऊन या म्हणून त्यांनी कुठून आणायचे? ही सगळी परिस्थिती आहे. मॅडम प्रशासन वॉर फुट लेव्हलवर काम करतोय. आम्ही ते मान्य करतो. ऑक्सीजनची कमतरता पुर्ण देशामध्ये आहे पण कुठेतरी सिस्टीमेटीक मॅनेजमेंट होणे फार गरजेचे आहे. आज मुंबई महानगरपालिका असुदेत इतर महानगरपालिका असुदेत जे प्राईव्हेट कोविड हॉस्पीटल आहेत ते आपले ऑक्सीजनची अरेजमेंट स्व:त करतात कुठच्याही मार्गाने. मिरा भाईंदरमध्ये आपण प्राईव्हेट हॉस्पीटलला परमिशन दिलेली आहे. कोविड हॉस्पीटल चालु करा त्यांनी चालु केले पेशंट ॲडमिट झाला की अडीच तीन लाख रुपयाचे बील. आज त्यांची व्यवस्था महानगरपालिका करत आहे ऑक्सीजन पुरवठा. मग त्या हॉस्पीटलची कॅपॅसिटी बघितली गेली नव्हती? आज बिलींगच्या बाबतीत राज्य

शासनाचा आदेश आहे कुठचाही पेशंट प्राईव्हेट हॉस्पीटलमध्ये ॲडमिट झाल्या नंतर डिच्चार्ज च्या अगोदर त्याच्या बिलचे ऑडिट महानगरपालिकेने करुन त्या हॉस्पीटलला पाठविले पाहिजे. आणि जे महानगरपालिका ऑडिट करेल त्या ऑडिट प्रमाणे त्याने ते हॉस्पीटलला बिल दिले पाहिजे. आज परिस्थिती काय आहे किती बिलचे आपण ऑडिट करत आहोत? आपले ऑडिटर किती बिलचे ऑडिट करत आहेत? माहिती मागुन सुध्दा माहिती मिळत नाही. नंतर पेशंटचे झगडे होते परिनामी पेशंट कुठच्या तरी लोकप्रतिनिधींना पकडतो त्या ऐरिया मधला मग त्याचे आणि हॉस्पीटलचे भांडन. अशी सर्व पॅनिक परिस्थिती आहे महापौर मॅडम. आणि ह्याच्या नंतर मी काल एक आदेश वाचला पेपरला बातमी होती आपल्याच अध्यक्षतेखाली मिटींग झाली होती. ह्या शहरामध्ये आज १८ ग्राऊंडवर बाजार चालु करण्यात येणार आहेत. गेल्या वर्षी डांगे साहेबांनी हा निर्णय घेतला होता. त्यांना तो निर्णय परत करावा लागला. कारण त्या आठवडा बाजारा मुळे एवढी गर्दी रोडवर दिसायला लागली कोरोना निघुन गेला फेब्रुवारी मध्ये कमी झाला पण फेरीवाले शहरामध्येच. आज १८ ठिकाणी तुम्ही डेली आठवडा बाजार सुरु करणार आहेत भाजीवाले मग तिथे भाजी वाले किती असतील फळवाले किती असतील आणि इतर सामान विकणारे किती असतील. आणि ह्या शहरामध्ये त्यांना कंट्रोल कोन करणार आहे? आज हॉस्पीटलसाठी तुमच्याकडे सिक्युरीटी गार्ड नाहीत. त्याच्या क चा प्रस्ताव तुम्ही दिला आहे. माझी आपल्याला विनंती आहे महापौर मॅडम आणि आयुक्त साहेब आपण निर्णय कसा घेतला माहित नाही. कोणाच्या प्रेशरमध्ये घेतला मला माहित नाही पण शक्यतो हे १८ ठिकणी तुम्ही बाजार सुरु करणार आहात ते कृपया करुन नाक. डांगे साहेबांनी त्यावेळी एक चांगली सिस्टीम काढलेली होती की ज्या ज्या रेसिडेन्शीयल सोसायटीज आहेत त्या त्या ठिकाणी डायरेक्ट फार्मा जवळून भाजीपाला सप्लाय करण्याची. आणि त्याला चांगला रिस्पॉन्स होतो. जिथे स्लम ऐरिया असेल तिथे व्यवस्था नसेल त्याठिकाणी जरुर सुरु करा. बिल्डींग ऐरियामध्ये रेसिडेन्शीयल ऐरियामध्ये अजिबात सुरु करु नका.

मा. महापौर :-

ठिक आहे सावंत साहेब.

अनिल सांवत :-

असे हे सर्व मुद्दे आहेत माझी अपेक्षा अशी आहे की आयुक्त साहेबांनी याचे सविस्तर उत्तर मला नंतर शेवटी द्यावे. धंन्यवाद.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या रिटा शहा मॅडम बोला.

रिटा शहा :-

धंन्यवाद मॅडम, पहिला तर मी तुमचे धंन्यवाद करते. ह्या कोविड संदर्भात जो विषय आहे तो तुम्ही पहिला नंबरवर घेतला. हा विषय मिरा भाईंदरमध्ये एवढा सिरीयस का झाला? कारण आपण आता बोलतो प्रशासनाचे धंन्यवाद करतोय याचे धंन्यवाद करतो त्याचे धंन्यवाद करतो धंन्यवाद केले तर आपल्याला सक्सेस भेटायला पाहिजे होती. तर आपण मना पासुन आणि हंडरेड परसेंट आपण धंन्यवाद केला असता. मॅडम माझा आरोप आहे की ज्या आधिकारी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन इथे प्रशासनाचे काम चालवत आहेत आता आपण लक्षवेधीमध्ये बघितले अधिकाराचा गैरवापर मॅडम. आपल्याला अधिकार भेटलाय त्याचा गैरवापर करायचा. एखादा माणसाचा फायदा करुन द्यायचा आणि आपण करुन टाकायचे. आणि शेवटी महाराष्ट्र शासनाचे नाव घ्यायचे. याचे नाव घ्यायचे त्याचे नाव घ्यायचे परंतु हे जे अधिकारी वर्ग आहे ते आपला हलगर्जी पणा मुळे हे जाणून बुजुन कार्यवाही करतात आणि जे कार्य करतात मॅडम ते निंदनीय आहे असे मी सांगत आहे. कारण मॅडम, ह्या अधिकाऱ्यांना महासभेचा नगरसेवकाचे मला असे वाटते कुठेही आदर राहिलेला नाही. कुठलीही भिती नगरसेवकांची ह्यांना राहिलेली नाही. आपण त्यांना केव्हाही फोन करा काही विचारा

कुठलाही अडचण देत नाही. आता प्रशांतने चांगला विषय काढला की ऑडिट करायला पाहिजे पेशंटचे. मागच्यामध्ये मी दिले होते दोन तीन पेशंटचे त्यांचे आजपर्यंत मॅडम ऑडिट झालेले नाही. कारण त्यांना त्याच्यामध्ये एक पैशाचा इंट्रेस नाही आणि त्याच्याही अगोदर मी जावून सांगते की आपले अधिकाऱ्यांचे मी तेव्हाही मागच्या महासभेत सांगितलेले होते काहीना काही संगणमत आहे म्हणून आजपर्यंत एकाही पेशंटला न्याय मिळाला नाही त्या ऑडिटच्या अंतर्गत. मॅडम कोविड वाढला. मी ऐकले की रेमडेसिवीर इंजेक्शन म्हणजे देव झाला आहे. ऑक्सीजन म्हणजे असे वाटते की शहरामध्ये आणि जे जीवन मध्ये आपण नॅचरली ऑक्सीजन घेत होतो ते गायब झालेले आहे असे वाटते मॅडम. रेमडेसिवीर इंजेक्शनचे ३ हजारचा कोटा मिरा भाईंदरला सॅन्शन झाला होता आणि तो येणार होता. फक्त १३०० रुपये भाव वाढवून आले होते. म्हणून ४ दिवस आयुक्ताने त्याचा विचार करायला लावले आणि तो साठा आपल्याला मिळाला नाही. म्हणून आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये तो इंजेक्शन भेटत नाही. आणि त्याचे ब्लॅक मार्केटींग खुप झालेले आहे. परंतु ह्या सर्व गोष्टीला अधिकारी जबाबदार आहेत. कारण १६ तारीख ला त्यांनी मंत्रालयामध्ये महाराष्ट्र शासनाकडे त्यांची मंजुरी बघितली की भाव वाटला आहे तर आम्ही काय करायचे. साहेब ह्या महासभाद्वारे मी आपणास सांगु इच्छीते की आमच्या स्थायी समिती मध्ये इकडच्या आयुक्ताला संपुर्ण पणे अधिकार दिले होते. तूम्ही एका इंजेक्शन मध्ये १०० रुपये २०० रुपये जास्त खर्च केले असते तर तुमच्यावर आरोप नाही लावला असता कारण आमचे इकडचे जे नागरीक आहेत त्यांना हा इंजेक्शन भेटला असता आणि ते वाचले असते. परंतु आपण काही डेरींग त्याच्यामध्ये नाही केली एवढी डेरींग आपण लक्षवेधीमध्ये केली. कारण तिकडे कोणाचा फायदा होत होता ह्या इंजेक्शनमध्ये तुम्ही डेरींग केली असती तर खुप लोकांचे जीव वाचले असते साहेब. परंतु आपण ते कर्तव्य नाही बजावले. काल रात्री मी आपल्याला मेसेज केलेला आहे एका रुग्णासाठी आपण बोलतो की आपल्याकडे टेंभा मध्ये ऑक्सीजन बरोबर आहे इकडे बरोबर आहे तिकडे बरोबर आहे साहेब काहीच बरोबर नाही. सर्व चुकीचे चालले आहे. लोकांना नागरीकांना आणि पेशंटला आणि त्यांचे नातेवाईकाला प्रीस्क्रिप्शन देतात की हे इंजेक्शन आणा ते इंजेक्शन आणा साहेब कुठुन आणनार? आपण एखादा टेक्सपेअर आता तुम्ही टॅक्स वसुलीसाठी किती लोक नेमले होते आणि काय काय कायदे काढले होते. एक टेक्स पेअर असे बोलणार की माझा घरात आता कोरोनामुळे नुकसान झालेले आहे माझा धंदा चालत नाही माझा घरात आरोग्य चांगले नाही म्हणून मी टॅक्स भरु शकत नाही. असे कोणाचे साहेब तुम्ही एकले नाही. आणि आता आपण काय बहाने देतो की ऑक्सीजन नाही जेवढे आहे तेवढ्यात आम्ही आमचे शंभर टक्के कार्य करतो. आम्ही असे करतो आम्ही तसे करतो पण साहेब ह्या शहरामध्ये जी महामारी चाललेली आहे त्याचे संपुर्ण जवाबदारी प्रशासनाची आहे. प्रशासनाला असे उत्तर देता योग्य नाही. त्यांच्या नातेवाईकाकडे प्रीस्क्रिप्शन द्यायचे त्यांना फोन करुन सांगायचे, प्लाझमा आणुन द्या ब्लड आणुन द्या, ऑक्सीजन आणुन द्या, इंजेक्शन आणून द्या ही जबाबदारी प्रशासनाची आहे आयुक्त म्हणून तुमची. कुठूनही तुम्ही आणुन द्या आणुन द्यायचे कर्तव्य तुमचे आहे. तिथे तुम्ही डेरींग करा साहेब. आमची परवानगी घेतल्या शिवाय आम्ही स्थायी समितीने तुम्हाला संपुर्ण अधिकार दिलेले होते. त्याचा वापर करायचा होता आणि इंजेक्शन बिंदास आणायला पाहिजे होते. २०० रुपये ३०० रुपये काय १ हजार पण जास्त पडले असते तर आम्ही मान्य केले असते. कारण इकडच्या नागरीकांचे जीव वाचले असते साहेब. टेंभा हॉस्पीटलला खाली जावून बघा साहेब शायद तुम्ही बघितले नाही किती मेलेली माणसे तिथे पडलेली आहेत आणि किती मरायला तयार झालेली आहेत तिकडे. हा सगळा हलगर्जी पणा आणि तुम्ही जे कर्तव्याचे पालण करत नाही तुम्ही जे डेरींग करत नाही त्याच्यामुळे झालेला आहे. डेप्युडेशनवर तुम्ही लोक आणतात ऑफिसर आणतात तुम्ही कुठच्या महासभेची परवानगी घेतात? असेच तुमच्या मनात आले आणि तुम्ही कोणाला पण बोलवून घेतले आणि इकडे बसवून घेतले. इथे जेष्ठता यादी नाही का तुम्ही डिक्लेअर करत नाही? का इकडे लोकांना तुम्ही प्रमोशन देत नाही? लेखा परिक्षक त्याच्यावर

तुम्ही १० माणसे नेमले कुठल्या महासभाची परवानगी घेतली साहेब? त्यांना तुम्ही महिन्याचा ४० हजार रुपये पगार देतात. आपले ४ लाख रुपये महिन्याला जातात. १२ करोड रुपयाचा तुम्ही तो तंबु वगैरे बांधले तुम्हाला जाणीव होती की सेकेंड फेस येणार आहे आणि त्या सेकेंट फेस मध्ये हे लागणार आहे सर्व तुम्ही भाड्यावर घेतले. परमनंट काही घेतले नाही. दुनिया भरचे पैसे खर्च केले. तुम्हाला सेकेंट फेस येणार म्हणून जाणीव होती म्हणून तुम्हाला ते पण समजले होते की ऑक्सीजन लागणार, इंजेक्शन लागणार, स्टाफ लागणार आहे, नर्स लागणार, डॉक्टर लागणार, पण तुम्ही काही तयारी केली नाही. तुम्हाला फक्त इंट्रेस्ट होता कुठे त्या लक्षवेधीच्या विषयामध्ये. तिथे तुम्हाला डेरिंग करायची होती पण तुम्ही एकही डेरींग केली नाही साहेब आमच्या शहरासाठी. कुठलीही डेरींग केली नाही कुठेही पुढे येऊन तुम्ही काम केले नाही. मी थर्ड ग्रेड आणि फोर्थ ग्रेड ह्या कर्मचाऱ्यांचे मी मनापासुन त्यांचे आभार माणेल. कारण त्यांनी त्यांचा जीव धोकयात टाकून त्यांनी सदरचे कर्तव्य पार पाडले आहे. साहेब आपले कर्मचारी जे मेले कोविड किंवा आपले ऑनड्युटीवर मेले असे कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना कायद्याने दिलेले आहे की त्यांना वारसा प्रमाणे त्यांना इथे आल्या इथे नौकरीत समाविष्ठ करावे. तिही यादी करायला तुमच्याकडे टाईम नाही. तुम्ही तुमचे कर्मचाऱ्यांचे पण काम करत नाही साहेब. हे माझे तुमच्यावर ऐलिगेशन आहे. आणि ह्या मिरा भाईंदर शहरामध्ये जी आता लोक मृत्यु मुखी पावलेले आहेत त्या लोकांचे दर्द बघुन त्या लोकांचे दु:ख ऐकुन आम्ही रात्र रात्र आम्हीही नगरसेवक झोपत नाही साहेब. आम्हालाही रात्रभर फोन येतात डॉक्टरांचे नर्स चे लोकांचे. इकडील चांगले चांगले डॉक्टर आम्हाला फोन करतात की आमच्या नातेवाईकांना कुठेतरी जागा करुन द्या. साहेब ही खुप दुखदाई घटना आहे आपल्या शहरामध्ये. ह्या शहरामध्ये आपल्याला आपण तो रविवार बाजार बंद केला नाही. आता पण आपल्या शहरामध्ये कुठे डिसीप्लेन आहे साहेब? लोकांना मनात आले तसे लोक फिरतात. मास्क घालत नाही. सोशियल डिस्टंन्सींगचा कुठे पत्ता नाही. नया नगरला जावून बघा बी.पी. रोडला जावून बघा काहीच वाटत नाही की लॉकडाऊन आहे. आणि त्याच्याही पुढे जावून सांगते साहेब की हा जो शहरामध्ये जे काही निर्माण झालेले आहे त्याच्यामध्ये आपण डेरींग करा आम्ही तुम्हाला पुर्ण पणे अधिकार दिलेला आहे. तुम्ही इतर गोष्टींसाठी टेंडरसाठी डेरींग करु नका तुम्ही ह्यासाठी डेरींग करा तुम्ही २००-४०० रुपये जास्त दिले असते तर आमच्या शहरामध्ये इंजेक्शन राहीले असते परंतु आपण ते काम केले नाही. १६ तारखेला तुम्ही पत्र पाठवतात मंजुरीसाठी तुम्ही का असे केले का तुम्ही हलगर्जी पणा केला? याच्या साठी कोण जबाबदार आहे? महापौर मॅडम, आपल्या महासभेला तेवढा अधिकार आहे की अशा अधिकाऱ्यांवर आपण कायदेशिर कारवाई करुन त्याच्यावर ठराव पास करु शकतो आपण. का आपण याच्यावर करणार नाही? आपण खुप सहन करुन घेतलेले आहे मॅडम आता आम्ही सहन करणार नाही ह्या शहराला ह्या करोनामध्ये ह्या कोविडमध्ये पुर्ण पणे पेशंटला उपाय योयजना भेटली नाही तर मी हे चालवून घेणार नाही. त्याच्या पुढाकार मी घेणार कारण आयुक्त म्हणून साहेब तुम्ही तुमचे कर्तव्य बनते. कुठलाही पेशंट तुमच्याकडे आला तुमच्या टेंभाला तुमच्याकडे जागा नाही तर त्यांना बॉम्बेला कुठेतरी तुम्हाला पाठवायला पाहिजे. कुठूनही तुम्हाला इंजेक्शन आणून द्यावे लागेल. साहेब तुमची ती जबाबदारी आहे. आणि ही जबाबदारी तुम्ही पाळा मग महासभेत कोविडसाठी ऐवढा टाईम घालवायचा प्रश्नच येत नाही. मला पासुन मी स्व:त तुमचे धंन्यवाद करणार. जय हिंद.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य दिनेश नलावडेजी तुम्ही बोला.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम मी आपणाला धंन्यवाद देतो भरपुर सदस्यांनी आपले विचार ह्याठिकाणी कोरोनाच्या संदर्भात मांडले. महापौर मॅडम, हा प्रत्येक नगरसेवकांचा विषय आहे. मला ही कालचा अनुभव आलेला आहे. काल मी रात्री ११:३० वाजता आमचा एक पेशंट ऑक्सीजन कमी होत होते

सिरियस झाले. टेंभा हॉस्पीटल खाली न्वहते. एक पण सिट नाही. प्रमोद महाजनला पाहिले सगळीकडे पाहिले प्राईव्हेट हॉस्पीटलमध्ये जावून आले कुठेही नव्हते. ती व्यक्ती मरणाच्या दारेवरती उभी होती. शेवटी मी प्रमोद महाजन येथे मुठे साहेब नोटल अधिकारी ह्यांना मी फोन केला, पानपट्टे साहेबांनी फोन केला, त्यांनी इकडे तिकडे सर्व धावपळ करुन टेंभाला विचारणा केली. दुसरीकडे विचारणा केली. रात्री ११:३० वाजता प्रमोद महाजनमध्ये पेशंटला ॲडमिट केले. मी त्यांचेही धंन्यवाद करतो ते रात्री ११:३० वाजेपर्यंत तिकडे होते. आम्ही पण रात्री ०१:०० वाजेपर्यंत महापौर मॅडम मला फक्त एकच विषय इथे सांगायचा आहे. आज ज्या पध्दतीने मिरा भाईंदर शहरामध्ये आपले जे कोरोना पेशंट वाढत आहेत त्याबाबतीत आपण प्रशासन सत्ताधारी म्हणून कुठल्या उपाय योजना शोधल्या जेणेकरुन रुग्न कमी होतील. रुग्ण वाढणार नाहीत. महापौर मॅडम, माझा एक विषय सत्ताधारी तुम्ही महापौर मॅडम आहेत. तुम्हाला ह्या शहराचे प्रथम नागरीक आहेत. आज ज्या पध्दतीने शहरामध्ये ५००-५०० कोविड रुग्ण पेशंट वाढत आहेत त्याच्यावरती आपण कुठल्या पध्दतीने विचार केला? आपल्याला पेशंट कमी करायचे आहेत. रुग्णसंख्या कमी झाली पाहिजे. आज रुग्ण संख्या वाढत आहे. त्याच्यामुळे आपल्याकडे डॉक्टरची संख्या कमी पडू लागली. सिस्टरची संख्या कमी पडू लागली. आज सगळी कडे प्राईव्हेट हॉस्पीटल फुल आहेत, सरकारी हॉस्पीटल फुल आहेत. आणि ह्याच्यामुळे आज हा मृत्युदर पहिल्या पेक्षा पाच पटीने आपल्या भाईंदरचा वाढलेला आहे. ह्याच्यामध्ये मला एकच म्हणायचे आहे आपण फक्त आरोप प्रत्यारोप करुन चालणार नाही. प्रशासन देखील त्यांचे काम करत आहे. आज ढोले साहेब देखील रात्री १२:००, ०१:०० वाजल्या पर्यंत नगरसेवकांना फोन करतात. परत फोन करत आहेत. आपण दोष रोष न ठेवता माझे ऐक मत आहे प्रशासन आणि सत्ताधारी मिळून तुम्ही ह्या शहराची कशा पध्दतीने रुग्ण वाढ रोखता येईल  त्याच्यावरती नियोजन तुम्ही करायला पाहिजे. आज ह्या शहरामध्ये आपण काही बंधने प्रशासन करायला लागले तर काही नेते मंडळी आम्ही लॉकडाऊन करु देणार नाही ह्यांचे पोट कोण भरणार? त्याला सरकार किती पैसे देणार? हा सगहा प्रकार येथे करुन चालणार नाही. आज तुम्हाला आणि आम्हाला सगळ्यांना मिळून महापौर मॅडन ह्यांचे नियोजन सत्ताधारी आणि प्रशासन म्हणुन तुम्ही सगळ्यांना तिथे विश्वासात घ्या. नगरसेवकांना विश्वासात घ्या. आणि तुम्हाला जनजागृती करण्यासाठी ह्या शहरामध्ये देखील मला फिरावे लागेल तरच आपले लोकसंख्या जोपर्यंत रुग्णांची वाढ होत नाही ती रोखता येईल तोपर्यंत हा प्रश्न सगळ्यां बाबतीत असाच राहील. हे लक्षात घ्या महापौर मॅडम. आज पासुन तुम्ही प्रथम नागरीक ह्या नात्याने शहरामध्ये जनजागृती करा. त्यांना कल्पना द्या, सगळ्यांना सांगा पण ते आवाहन आपण कोणी करत नाही. आणि अजुन पब्लिक ह्या मिरा भाईंदर शहरामध्ये....................

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य नलावडेजी हा विषय मी गटनेत्यांच्या बैठकीमध्ये मांडला की जनजागृती करण्याची गरज आहे. आपल्याच नेत्यांनी सांगितले की जनजागृतीची सध्या गरज नाही. तरी मी सुध्दा तुमच्या विषयावर नक्कीच प्राधान्याने विचार करते आणि मलाही असे वाटते की सध्याची परिस्थिती जी कोविडची ह्या शहरामध्ये आहे ती कुठेतरी थांबली पाहिजे आणि त्यासाठी प्रशासन आपण आपण सर्व नगरसेवकांच्या मदतीने शहराला ह्या कोविड पासुन मुक्त करण्यासाठी आपण प्रयत्न करुया. सन्मा. सिमा शहा मॅडम तुम्ही बोला.

सिमा शहा :-

नमष्कार मॅडम आपका धंन्यवाद. मैने यह बात के लिऐ तीन बार आयुक्तजी से उपायुक्तजी से बात कि है एक हेल्प लाईन नंबर क्यो नही हमारी और से हो रहा है? सब से पहले आर.टी.पी.सी.आर. का अगर हम लोगो ने अभी तक मै ३१ मार्च तक मै २ करोड ४१ लॅक का आर.टी.पी.सी.आर. के लिऐ हम लोगो ने यह सारी चिजे दि है खर्च किया है। उसके बाद एक मशीन हम लोगो अपने यहा इंम्पीमेंट नही कर पारहे है। यह इतनी जरुरवाली चिज है। रेमडिसिवीर अगर ८

जगह ८ हॉस्पीटल को १७ तारीख् का आदेश है आयुक्तजी का की ८ प्राईव्हेट हॉस्पीटल को दिया जा रहा है ८ मै मैने बार बार एकही सवाल पुछा की हमारे यहा हमारे टेंभा हॉस्पीटल हमारे प्रमोद महाजन मै अपनेही डॉक्टर क्यो लिख कर दे रहे है? यह क्या पब्लिक को परेशन करनेवाली बात कर रहे है। इंजेक्शन वाली बात सबसे बढी तकलिफ सबको दे रही है। जिनका ५ और ६ का रँक है। और ५ और ६ रँक है उनको भी रेमडेसिवीर लग रहा है क्या? डॉक्टर होके डॉक्टर का जवाब डॉक्टर देंगे की और कोई देगा? हर किसी को रेमडेसिवीर लेके आवो यह सवाल क्यो आता है? अपने टॅक्स डिपार्टमेंट मै जगदीश पाटील कर के व्यक्ती है उसको प्लाझमा चाहिये था मैने बॉम्बे सेंट्रल से प्लाझमा उनको कराके दिया। अपने प्रमोद महाजन मै साधा कागज पै लिख के दिया की इनके लिऐ प्लाझमा लेके आवो ओ इनसान बॉम्बे सेंट्रल जाके वापस आया की ओ साधा कागज नही चलेगा क्या अपने डॉक्टरोको यहभी नही पता है की प्लाझमा किस तरह से लिया जाता है, या उसके लिये क्या डाक्युमेंट करनी पडती है? साधा कागज पै लिख कै दे दिया ओ बंदा दौड दौड के चले गया बॉम्बे सेंट्रल । मॅडम एक नही अनेक परेशानिया है इस तरह से है प्रशासन नही सुनता है अलग बात है प्रशासन कर रहा है यह मालुम है एक व्यक्तीका अगर हमने छोटी से छोटी समस्या पुछी है तो उसका जवाब नही आ रहा है। हेल्पलाईन जरुरी है यह मैने १० बार बोल दिया क्यो नही हो रहा है उसके उपर इम्प्लीमेंट?

मा. महापौर :-

ठिक है मॅडम आपको भी आयुक्त साहब खुलासा देंगे ।

सिमा शहा :-

आयुक्त साहब से मेरा एक ही रिक्वेस्ट है जितने डॉक्टर जितने सेंटर अपने वर्क कर रहे है और किसी को नही लेकीन ॲटलिस कॉर्पोरेटर्स को तो उनकी डिटेल्स दिजाऐ । यह देने की वजह ऐसी होगी की हम १० जणो को नही बोलेंगे हम सिधा ओ कंन्सन कोही बात करेंगे। और एक बात थी मॅडम एक बार तो मैने जरुर दिया है प्लाझमा जो अपने यहा जो लोक ठिक होके जाते है उनको कम से कम प्लाझमा के लिये बॉन्ड करवाईये की ३१ साल से ४५ साल तक के जो व्यक्ती है वो बौंड करे और वो प्लाझमा जरुर डोनेट करे इतरना बौंड कराईये. धंन्यवाद.

मा. महापौर :-

ठिक है मॅडम. सन्मा. वंदना ताई पाटील मॅडम तुम्ही बोला.

वंदना पाटील :-

महापौर मॅडम, तुमच्या परवानगीने बोलते, आपले इकबाल खान म्हणून एक पेशंट होते ते टेंभाला ७ तारखेला ॲडमिट झाले. आणि १८ तारखेला त्यांच्या आईला टेंभा हॉस्पीटल मधुन फोन आला की ते सिरीयस झाले आहेत तुम्ही आय.सी.यु. बेड अरेंज करा म्हणून. त्यांना ६ तारखे पर्यंत १८ तारखेपर्यंत टेंभा हॉस्पीटलला होते तर त्यांना आय.सी.यु. मध्ये टाकता आले नाही का? एवढे सिरीयस होईपर्यंत. आणि त्यांना १२ वाजता बोलविले गेले की तुम्ही आता या तुम्ही म्हणे पेशंटला हलवा. आणि त्यांनी इकडे तिकडे फोन केले तर डॉक्टर अल्पेश होते त्यांना फोन केला तर ते बोलले की तुम्ही डॉ. पडवळांना फोन करा. डॉ. पडवळांना फोन लागला पण त्यांनी फोन उचलला नाही. मग आम्ही साईट ओपन केली कोविड बेड एम.बी.एम.सी. तर त्याच्यात आपल्याला प्रमोद महाजन आहे त्यांच्याकडे ३ आय.सी.यु. खाली दाखवत होते. मग त्यांना सांगितले की तुम्ही तिथे जावून करावे लागेल. त्यांनी सांगितले टेंभा हॉस्पीटलमध्ये की तूम्ही तिथे चौकशी करा. आपण करु शकत नाहीत का एकडचा पेशंट तिकडे हलवायचा असेल तर? तर आपण तिकडे करु शकत नाही का की आय.सी.यु. तिकडे खाली आहे की नाही कारण तो आपलाच पेशंट आहे. मग ती आई तिकडे १ वाजता पोहोचली त्यानंतर तिथुन डॉक्टर चकोर यांना फोन केला त्यांनी मला अल्फा म्हणून त्या लेडीजला फोन केला ते देखभाल करतात म्हणून मग त्यांना फोन केला तर त्या काय बोलल्या की तुम्ही त्यांना पेशंटच्या

आईला सांगा त्या गार्डला सांगा ते गार्ड येऊन आतमध्ये सांगतील. आणि गार्डला सांगितल्या नंतर गार्ड बोलला की बेड खाली नाही. हा काय प्रकार आहे? आज त्या पेशंटला त्यांच्या आईला बोलवून सांगण्यात आले की तो मृतयुमुखी पडला. हा प्रकार काय आहे मॅडम? याला जिम्मेदार कोण?

मा. महापौर :-

साहेब हा विषय जरा गंभीर वाटत आहे. यावर खुलासा द्या.

वंदना पाटील :-

फक्त वय ४५ आहे मॅडम. मॅडम मी अल्पा मॅडमला एवढी रिक्वेस्ट केली की निदान त्यांना आय.सी.यु. मध्ये ठेवा. म्हणे त्यांना व्हेंटीलेटर लागेल. मी सांगितले तिथे आय.सी.यु. नाही तुम्ही सध्या आय.सी.यु. मध्ये तरी त्यांना ठेवा. ते म्हणाले नाही तुम्हाला डॉ. पडवळांशी बोलावे लागेल.

मा. महापौर :-

हे प्रशासनाच्या माध्यमातुन आणि त्या डॉक्टरांच्या माध्यामातुन अशी जर घटना घडत असेल तर ती अतिशय खेदाची गोष्ट आहे साहेब. गंभीर विषय आहे.

वंदना पाटील :-

याला जिम्मेदार कोण आहे मॅडम?

डॉ. पडवळ :-

सन्मा. सदस्या याबद्दल आपण सकाळी बोललात त्यावेळेस पण मी सांगितले होते तेच आता मी मॅडम किंवा सरांपुढे पण सांगतो. टेंभ्यामध्ये ४० आपले आय.सी.यु. चे बेड आहेत. त्यापैकी साधारन ३० व्हेंटीलेटर अव्हेलेबल आहेत. सर्व ४० बेड आय.सी.यु. चे फुल आहेत. खाली आय.सी.यु. नसताना २० पेशंट किमान यांना आय.सी.यु. ची गरज आहे असे खाली २० पेशंट असतात. ऐनिटाईम. त्यांना आपण बाहेर रस्त्यावर न सोडता घेतो का रस्त्यावर फिरत राहिला तर डेथ होऊ शकते म्हणून आपण जो काही ऑक्सीजन तरी आपण् त्याला देऊ शकु १५ लिटर पर्यंत म्हणून आपण त्यांना खाली घेतलेले असते. त्याच्यातील बरे पेशंट जे सिरीयस होतात त्यांना आय.सी.यु.ची गरज लागते म्हणजे आय.सी. यु. म्हणजे प्रॉपर विथ व्हेंटीलेटर पण वरचे जोपर्यंत पेशंट डिच्चार्ज होत नाही किंवा डेथ होत नाही तोपर्यंत वरचा व्हेंटीलेटर वाला बेड खाली होत नाही तोपर्यंत खालचा पेशंट वर शिफ्ट करता येत नाही. कितीही तुम्ही सांगितले किंवा असे होत आहे असे होत आहे पेशंटला गरज आहे तर तसे २० पेशंट खाली असतात. मग त्याच्यामध्ये ज्यांना खरच आता त्याचे टायट्रेशन तर आपण नाही करु शकतो त्याठिकाणचे जे टिनिशन्स आहेत ते ठरवतात की कुठला पेशंटला घ्यायची आता तातडीने गरज आहे आणि कुठल्याला आपण नंतर घेऊ शकतो. आणि त्या दृष्ट्रीने प्रायोरीटी देऊन त्याठिकाणी पेशंट वर शिफ्ट केले जातात. मी सकाळी पण बोललो की वरचे जे पेशंट आहेत ते दोन दोन तीन तीन आठवड्या पर्यंत एक महिन्या पर्यंत पण आय.सी.यु. मध्ये व्हेंटीलेटरवर आपण त्यांना जेवण ठेवलेले आहे. तसे पेशंटचे बेड लवकर रिकामे होत नाही. त्यामुळे खालच्या पेशंटला वर शिफ्ट करता येत नाही. त्यामुळे बरेच डेथ वरचा आय.सी.यु. उपलब्ध न झाल्यामुळे व्हेंटीलेटर उपलबध न झाल्या मुळे खाली वॉर्डमध्ये पण डेथ झालेले आहेत. आणि आपण जे बोलतात त्याची डिटेल्स माहिती मी घेईनच मी आज महासभेच्या याच्यात होतो त्यामुळे मला जास्त काही बोलता आले नाही टेंभा रुग्णालयाशी परंतु याची डिटेल्स मी माहिती घेईन की त्या रुग्णाला खरच गरज असताना घेतले गेले नाही किंवा काय याची आम्ही चौकशी करुन मॅडम तुम्हाला आम्ही त्याचे उत्तर देऊ.

मा. महापौर :-

ठिक आहे. परसनली वंदनाताई पाटील नगरसेविका ह्यांना तुम्ही त्याबाबतचा खुलासा फोन करुन देण्यात यावा.

वंदना पाटील :-

मॅडम हे बरोबर नाही आहे. तुम्ही जर जागा खाली असताना पण मग तुम्ही साईट का ओपन क्यालात? जर त्या साईटमध्ये तुम्ही दाखवतात आय.सी.यु. बेड खाली आहेत मग त्याठिकाणी त्याला का टाकले गेले नाही? मग ते आय.सी.यु. बेड तुम्ही असेच खाली ठेवले का?

मा. महापौर :-

मॅडम त्यावेळी आय.सी.यु. चे बेड खाली नव्हते.

वंदना पाटील :-

होते मॅडम, आम्ही १८ तारखेला.

मा. महापौर :-

वेटींगला होते त्यांनी प्रशासनाने आता खुलासा दिला. त्यामध्ये ते म्हणतात २० बेड वेटींगला होते.

वंदना पाटील :-

पण प्रमोद महाजनला त्या साईटवर तुम्ही का दाखवली आय.सी.यु. बेड ३ खाली आहेत म्हणून.

मा. महापौर :-

तुम्ही साईट वगैरे चेक करत जा. अशा पध्दतीचे होत असेल तर त्याच्यामध्ये पेशंट कंफ्युज होतात.

मा. आयुक्त :-

उपमहापौराच्या सुचने नुसार आपण ॲक्युफाईड म्हणून ४-५ बेड टाकलेले आहेत.

वंदना पाटील :-

मॅडम मी कालही एक पेशंट रात्री पाठवला. २ वाजेपर्यंत तो प्रमोद हॉलच्या बाहेर उभा होता. त्याला आत घेतले गेले नाही. सांगितले जागा खाली नाही तो पेशंट आता घरी आहे. कारण त्याची फाईनांन्सीयल कंडीन नाही की तो प्राईव्हेट मध्ये जावू शकतो.

मा. महापौर :-

आयुक्त साहेब खुलासा देत आहेत.

मा. आयुक्त :-

मॅडम आपण जे आता खान नावाचे पेशंट बाबत सांगितले त्यात दोन गोष्टी आहेत की जो बोर्ड वर तुमचे म्हणणे आहे की व्हॅकन्सी दाखवल्या आणि प्रत्येक्षात गेले तर नव्हते ह्या बाबत पहिला टेंभा हॉस्पीटलचे सांगतो, टेंभा हॉस्पीटलमध्ये ४० आय.सी.यु. बेड आहेत आणि २१० ऑक्सीजनचे बेड आहेत. थोडक्यात मी वस्तुस्थिती अशासाठी सांगत आहे मला संपर्ण ॲक्च्युअली खुलासा करायचा आहे. तो खुलासा झाल्यावर हे प्रशन उत्तर झाले तर अजुन चांगले राहिले असते. परंतु मा. महापौर मॅडम आणि सर्व सदस्यांच्या भावना होत्या की आमच्या आधी प्रशनांची उत्तरे द्या नंतर तुम्ही खुलासा करा. तर प्रत्येक हॉस्पीटल व्हाईज जर आपल्याला स्टेटस सांगितले की तुमचे हॉस्पीटल टेंभाला पेशंट होते आणि प्रमोद महाजनला नेताना हा तुम्हाला आलेला अनुभव सांगता टेंभा हॉस्पीटल बद्दल बोलतो ४० आय.सी.यु. बेड आपल्याकडे आहेत. आणि २१० हे ऑक्सीजन बेड आहेत. हे फुल कॅपॅसिटीने चालत आहे. सगळ्यात महत्वाचे म्हणजे हे पेशंट बचेर जण एकदम सिरीयस झाल्या नंतर किंवा एकदम टोकाला ब्रितलेस व्हायला लागल्या नंतर ज्यांचे रेडिंग १८-२० पर्यंत जाते आणि मिनिटाला १८ ते २२ लिटर पर्यंत ऑक्सीजन जातो तेव्हा त्यांना ॲडमिट करतात. त्यानंतर पेशंटचे एक एक महिना तीन तीन आठवडे २०-२० दिवस ते आय.सी.यु. मधून बाहेर येत नाही तोपर्यंत नविन पेशंटला संधी मिळत नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की जे पेशंट ऑक्सीजन बेडवर आहेत टेंभा किंवा इतर ठिकाणी त्यातले सिरीयस झालेले पेशंट आय.सी.यु. बेडमध्ये राहण्यासाठी वेटींगला

असतात. २०-२०, १८-१८ पेशंट हे ५-५, ८-८ दिवसा पासुन ओटो बेडवर आहेत परंतु त्यांना आय.सी.यु. पाहिजे. त्यासाठी ते वेटींग आहेत. आपल्याला मी एक विनंती पुर्वक सांगाते बरेच पदाधिकारी असतील सोशियल सरवंट असतील आणि कुठल्या वेगवेगळ्या क्षेत्राचे नामवंत असतील जागा नाही हे त्यांना कळवळीने सांगितले किंवा ऑक्सीजनची रेमडेसिवीरची परिस्थिती ह्या सगळ्या परिस्थित्या त्यांनाही माहित असते. आपण सगळे सुज्ञ आहोत सगळ्यांना सगळी परिस्थिती माहित आहे. परंतु काही करा निदान तुम्ही त्याला लॉबी तरी घ्या. व्हेजेल्टी तरी घ्या चेक तरी करा म्हणून फोर्स फुली आपल्या येथे पेशंट सोडतात. त्यांचे म्हणणे घरी तरफडून मरण्या पेक्षा किंवा गेटवर एकदा घ्या. पहिल्यांदा आपल्याला बरेच जन असे फोर्सफुली पेशंटला जागा नसताना घ्यायला लावतात. तुम्हाला बिलिव्ह होणार नाही बऱ्याच आता त्यांना वरंड्यांत किंवा स्ट्रेचरवर सुध्दा आपण ऑक्सीजन आणि सलईन दिलेल्या आहेत आपल्या स्टाफने. रात्री ३-३, अडीच वाजता कुठ कुठले फोन येतात. अगदी मंत्रालया पासुन ते नगरसेवक यांच्या पर्यंत सर्व स्तरातील सगळ्या सन्मा. सदस्यांची सर्वांची फोन येतात. मला सगळ्यांचा आक्रोश आणि हे समजते परंतु जे जे आपली कॅपॅसिटी आहे पुर्ण कॅपॅसिटीने जरी वापरले आपल्याकडे उपलब्ध असणारी सगळी साधन सामग्री त्याच्यासाठी मिळणारे रेमडेसिवीर आणि मिळणारा ऑक्सीजन सगळ्यात ज्वलंत समस्या आहे ती ऑक्सीजनची. ह्याच्यात जेवढे जेवढे पेशंटची कॅपॅसिटी पेक्षा एक्स्ट्राचे पेशंट ठेवतात. काल दोन चार दिवसा पुर्वी किंवा आठ दिवसा पुर्वीचा किस्सा सांगाते, पेशंट चेंबुर वरुन निघाल्या नंतर त्यांनी सांगितले होते की हे पेशंट घेऊन जा. हे पेशंट टीकणार नाही गेल्यात जमा आहे तो घेऊन जा. ॲम्ब्युलन्स मधुन तो सदगृहस्त घेऊन निघाला मला सी.एम. ची व्हिसी ठाण्यात असताना मला फोन आला ठिक आहे म्हटले आपण ट्राय करु तु घेऊन ये. त्याला माहित होते हा पेशंट काही क्षणात जाणार आहे तिथुन निघाला त्याच्या फोन बंद पडला त्याच्या मुलाला संपर्क केला प्रमोद महाजनच्या गेट येईपर्यंत तो मेलेला होता. ॲम्ब्युलन्स मधुन पेशंट खाली का घेत नाही म्हणून त्यांनी तिथे मिडिया बाजी केली. आपल्या डॉक्टरांना शिवीगाळ केली हे तुम्ही सगळ्यांनी पाहिलेले आहे. पेशंट जातो जवळचा नातेवाईक कोणाचाही जातो किंवा घराचा माणुस जातो याचे दु:ख सगळ्यांना असते. लोक इमोशनमध्ये येतात. आपल्या कर्मचाऱ्यांना डॉक्टरांना शिवीगाळ करतात. कोणी धमकवतात कोणी मारतात. अधिकारी, कर्मचारी आपल्यातले पण एकच आहेत. तुमच्या सारखेच आम्ही पण आहोत. दिवस रात्र मेहनत करत असतात. आता उदा. प्रमोद महाजनला बोलले तर आपले मुठे साहेब सिनेरीटी डेप्युटी कमिश्नर तिथे नेमलेले आहेत. त्याच्या नंतर बच्छाव सहाय्यक आयुक्त तिथे नेमलेले आहेत. चकोर नेमलेले आहेत. त्याच्या नंतर आपला सी.एम.ओ. आहेत. त्याच्या नंतर आऊट सोर्सिंग करणारे डॉक्टरर्स आहेत. त्यांच्यावर कंट्रोल करण्यासाठी आपल्यातले ५-५ अधिकारी आपण तिथे नेमलेले आहेत. टेंभा हॉस्पीटलसाठी पानपट्टे साहेब आहेत. त्यांच्या जोडीला डॉ. प्रकाश जाधव आहेत. त्या नंतर आपल्या महापालिकेने ४५ ते ५० डॉक्टर टेंभा हॉस्पीटलला पुरवलेले आहेत. टेंभा हॉस्पीटलची पाहिली तर जबाबदारी आपण ह्या हॉस्पीटल राज्य शासनाच्या आरोग्य विभागाला दिलेला आहे. परंतु आरोग्य विभाग कुठलीही जबादारी पेलत नाही, त्यांचे कर्मचारी किंवा तिथे असणारे सिव्हील सर्जन १० वाजता येऊन ५ वाजता रेग्युलर निघुन जातात. कोविडच्या अनुषंगाने जो भार आहे टेंभा हॉस्पीटलचा राज्य शासनाच्या आरोग्य विभागाचा हॉस्पीटल असुन सर्व भार महापालिका झेलते. साधे ऑक्सीजनची किंवा १०० रेमडेसिवीर आरोगय विभाग देत नाही. टेंभा हॉस्पीटलमध्ये काय प्रॉब्लेम झाला तर आपण महापालिकेला करतो. टेंभा हॉस्पीटलच्या कुठल्या कर्मचाऱ्यावर जर ॲक्शन घ्यायची ठरली तर त्याला राज्य शासनाचा आरोग्य विभाग जबाबदार असतो. आपल्यावर त्याच्यावर कारवाई करता येत नाही. त्याठिकाणी तर नेहमी असा ऑक्सीजन कट टू कट असतो ऑक्सीजनचा टॅंक आपला ६ केएल चा तो पुर्वी २७-२८ तास पुरायचा. आपल्याला २४ तासाने ऑक्सीजन मिळतो आता ऑक्सीजन जातो १८ तास. १८ तासा पासुन २४ तासा पर्यंतचा जो प्रवास आहे तो ऑक्सीजनचा आपण सिलेंडर वर चालवतोय. डोळ्यात तेल घालुन

६-६, ८-८ अधिकारी फक्त ऑक्सीजनवर आपण नेमलेले आहेत. संपुर्ण महापालिकेतील अधिकारी सर्व विभागाचे लेखा परिक्षण विभाग असे सचिव विभाग असो बांधकाम विभाग असो अहोरात्र सगळ्यांना सगळ्या ठिकाणी नोडल ऑफिसर म्हणून देऊन सगळे एकमेकांच्या संपर्कात असतात. उदाहरणार्थ सांगतो रात्री १२ वाजता लाईट दोन तीन दिवसा पुर्वी संमृध्दीची गेली. १५-२० मिनिटात सगळे आपले अधिकारी खांबित साहेब असतील दिग्विजय चव्हाण असतील आणि सर्व अधिकाऱ्यांनी धरपळ करुन केली. डे नाईट तिथे आपण सगळ्या ठिकाणी मॉनिटर ठेवला आहे. महापालिका लेव्हलला आपण अधिकारी लेव्हलला कुठल्याही प्रकारची कसलीच कमतर्ता ठेवत नाही. ज्या दोन प्रमुख समस्या आहेत ज्या भौवती सगळे येऊन थांबतात तो म्हणजे प्रमुख मुद्दा आहे ऑक्सीजन आणि दुसरा मुद्दा आहे तो रेमडेसिवीर. ऑक्सीजनच्या बाबतीत सांगायचे झाले तर ठाणे जिल्ह्याच्या ऑक्सीजनची गरज आहे ३०० मेट्रीक टन, ठाणे जिल्ह्याला आज ऑक्सीजन मिळत आहे १८० मेट्रीक टन म्हणजे एकुण रिक्वायरमेंटच्या ६० टक्के ऑक्सीजन मिळतो. आणि तोही २४ तासाचा ऑक्सीजन असेल तर आपल्याला १२-१५ तासाला देतात. तो तुम्हाला परत तो १२-१५ तासात आणल्या शिवाय गत्यंतर नसते. ऑक्सीजन मिळण्याचे सोर्स आहेत खोपोलीला एक मिळतो, अलिबागला एक मिळतो, मुर्बाड आहे, आणि तळोदा आहे. १००-२०० गाड्यांचा टँकरच्या रांगा लागलेल्या असतात. ह्याच्यावर उपाय म्हणून आपण ठाणे जिल्हा कलेक्टर ऑफिसला प्रियंका भोसला सहा.आयुक्त म्हणून खास ऑक्सीजनच्या मॅनेजमेंट आपल्यासाठी आणि खाजगी दवाखान्यांना नियोजन करुन देणेसाठी नेमलेले आहे. त्याचे कोऑर्डिनेशन परत आपले म्हसाळ साहेब करतात. त्यांच्या सोबत जोडीला वाघमारे साहेब आहेत. सगळ्यांच्या बरोबर ह्यांनी नियोजन नको म्हणून मी प्रत्येक्ष एक एक घटनेत प्रत्येक गोष्टीत डोळ्यात तेल घालुन आपण करत असतो. तर मला हे सांगायचे आहे उदा. सांगतो आपण परवा तळोदा हून इथे टँकर आणताना चार पाच दिवसा पुर्वीची घटना आहे ग्रीन कोरेडोअर करुन सगळे रस्त्यांची वाहने हटवून मिरा भाईंदरला जर ऑक्सीजन पडला तर पेशंट तरफळून मरतील. म्हणून तीन पोलीस कमिश्नरशी बोलून नवी मुंबई पोलीस, ठाणे पोलीस आणि मिरा भाईंदर अशा अवस्थेत आपण गेले १० दिवसा पासुन कसरत करत आाहोत. जे जे ऑक्सीजनचे शॉर्टेज आहे. एकुण रिक्वायरमेंटच्या ६० टक्के ऑक्सीजन आहे ठाणे जिल्ह्याच्या कोट्यात. त्यामुळे अतिशय सतर्क राहून १०-१० अधिकारी एका अधिकाऱ्याचे काम आहे त्या ठिकाणी १०-१० अधिकाऱ्यांना रक्त ओतावे लागते. तेव्हा तो ऑक्सीजन मिळते. रेमडेसिवीरच्या बाबतीत झाले तर पुढे फुड अँड ड्रग्स डिपार्टमेंटचे पुर्ण कंट्रोल आहे. त्याच्या नंतर जिल्हाधिकाऱ्यांकडे यादी जाते. महापालिकेला जो देणार आहे तो हाफकिन इंस्टीट्युट देते राज्य शासनाकडून. महापालिकेने कुठल्याही ऐजन्सीला फोन केले, मेल केला एकही ऐजन्सी डायरेक्ट कुठलाही रेमडेसिवीरचा साठा वितरीत करत नाही. त्याच्यामुळे रेमडेसिवीर तुम्ही एक इंजेक्शन ३ हजार, ५ हजार, १० हजार रुपये जरी खर्च करणार असेल तर रेमडेसिवीर आपल्याला कुठूनही डायरेक्ट उपलबध होत नाही. त्याचे पुर्ण कंट्रोल हे फुड अँड ड्रग्स हे डिपार्टमेंट राज्य शासनाचे आहे. राज्यशासनाचे रेमडेसिवीर हे केंद्र शासनाकडून येते. आणि राज्य शासनाला रेमडेसिवीर मिळाल्या नंतर ते ते लोकसंख्येच्या प्रमाणात कोविडचे इंफेक्शन झाल्याच्या प्रमाणात त्याचे वाटप करतो. आम्ही दिवसात दररोज सगळ्या ऐजन्सीला सगळ्या काँट्रॅक्टरला आणि गव्हर्नमेंटच्या हाफकिन असेल जिल्हाधिकारी असतील राज्य शासनाचे आरोग्य विभाग असेल. आणि ज्यांना आपण पुर्वी काँट्रॅक्ट दिलेले सिपला सारख्या कंपन्या असतील आम्ही त्यांना रोज पत्र लिहीतो, फोन करतो, एक मेल करतो. असा कुठलाही दिवस महापालिकेतला ६-६, ८-८ ठिकाणी आम्ही प्रयत्न करतो. एक एक रेमडेसिवीर मिळण्यासाठी. जेव्हा शासनाकडून रिलिज होईल शासना कडून मिळेल अर्थात त्यावेळी महापालिकेला मिळणारच आहे. परंतु आपले एकाच महापालिकेत नव्हे तुम्ही आजुबाजुच्या महापालिका मुंबई महापालिका कुठेही चौकशी करा दुसऱ्या ठिकाणी मिळत आहे आणि आपल्या महापालिकेत नाही असे कुठेच नाही. राहिला प्रश्न बेडचा कुलाब्या पासुन नरिमन पॉईंट पासुन वसई, विरार, ठाणे, नवी

मुंबई कुठल्याही ठिकाणी बेडची काय स्थिती आहे ही चौकशी करा. ज्या दिवशी पेशंट डिस्चार्ज होतात त्यादिवशी पटकन आपल्याला बेड मिळतो. तर पेशंट डिस्चार्ज नाही झाला जो पेशंट अन्टेबल आहे जो पेशंट बेशुध्द अवस्थेत आहे त्याला तर रिलिज करुन आपण नविन लोकांना बेड देणे उचित नाही. आपल्या बेडची कॅपॅसिटी आपल्या हॉस्पीटलची कॅपॅसिटी २५० आहे आणि ऑलरेडी आपण तिथे २७५ लोक आणुन बसविले २५ तर बाहेर कॉरेडोअर मध्ये ठेवलेत आपले काही पदाधिकाऱ्यांकडून त्यांच्याकडून विनंती करण्यात येते की नाही साहेब आत तरी घ्या काय होईल ते होईल तुम्ही जमेल तेवढी ट्रीटमेंट द्या अशा अवस्थेत प्रशासन काम करते की कॅपॅसिटीच्या दिड पट दुप्पट पर्यंत पेशंटची मागणी आहे. एकुण ऑक्सीजनच्या ६० टक्के मिळतो. रेमडेसिवीर आणि ऑक्सीजनचे पुर्ण नियोजन नियंत्रण केंद्राचे आणि राज्य सरकारचे आहे. कुठलेही महापालिका आयुक्त किंवा महापौर किंवा तुम्ही सन्मा. सर्व पदाधिकारी ह्यांच्या हाथात ह्या दोन गोष्टी नाहीत. म्हणून मला सगळ्यांना अपील आहे मला तर ॲक्युअल म्हणजे हा विषय निघाला म्हणून सांगतो, मला सगळेच गोष्टी मुद्देसुद आपल्याशी बोलायचे आहे वास्तविक त्या गोष्टी ऐकल्या नंतर जर आपण बोललो तर प्रत्येक प्रश्नाचे उत्तर अजुन मुद्देसुद मिळतील आणि तुमचे जे प्रश्न आहेत ते बरेच शंका तर ते प्रश्न विचारायची आवश्यकता राहणार नाही असे मला वाटते. तर आपली परवानगी असेल तर मी मुद्देसुद सगळ्या गोष्टी सांगतो.

मा. महापौर :-

सदस्यांचे अजुन काही विषय बाकी आहेत. जे विषय चर्चेला झालेले आहेत त्या विषया व्यतिरिक्त जर बोलायचे असेल तर बोला. सन्मा. नगर सेविका नयनाताई म्हात्रे बोला.

नयना म्हात्रे :-

मॅडम धंन्यवाद मला तुम्हाला फक्त ऐवढच सांगायचे आहे की हे अधिकारी घरुन सगळे पाठ करुन येतात की नगरसेवकांना काय उत्तरे द्यायची काय करायचे पण प्रत्यक्ष लोकांना काय त्रास होतो त्यांना कळतच नाही मॅडम, माझे एवढेच म्हणणे आहे तुम्हाला, आणि उपमहापौरांना की ह्यावर एक नगरसेवकांची कमिटी तयार करा. जेणेकरुन ह्या अधिकाऱ्यांना सगळ्यांना धाक राहिल आणि त्या कमिटीला विचारल्या शिवाय कुठचाही निर्णय घेता येणार नाही अशी कमिटी तयार करा मॅडम. मला फक्त एवढेच बोलायचे आहे. परंतु हे सांगितल्या प्रमाणे मॅडम हे घडले पाहिजे. कमिटी तयार करा.

मा. महापौर :-

ठिक आहे. तारा घरत मॅडम तुम्ही बोला.

तारा घरत :-

धंन्यवाद मॅडम, बोलायला दिल्या बद्दल, मी विचारते ऑक्सीजन वसई, विरार वरुन येते आपल्याला ऑक्सीजन पुरेसा मिळतो का? प्रत्येक वेळेला ऑक्सीजन कमी आहे म्हणून सांगतात पण पुरेसे मिळत नाही की मिळते?

मा. महापौर :-

आता मिळत आहे मॅडम.

तारा घरत :-

कारण मी वसई विरारचे ऐकून आहे की वसई विरारला गाड्या आपल्याकडे येणाऱ्या ते तिथे वळवतात. आमच्याकडे दिल्या शिवाय पुढे जायचे नाही.

मा. आयुक्त :-

त्याच्या खुलासा असा आहे मॅडम, महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो ऑक्सीजनचा कोटा आहे परत फुड अँड ड्रग्स डिपार्टमेंट आणि जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली होते. तर त्याठिकाणी समनवयात अभाव राहू नये म्हणून आपले स्व:त आपले महापालिकेचे अधिकारी ठाणे कलेक्टर ऑफिसला बसविलेले आहेत. कुठला टँकर कुठल्या महापालिकेला जाईल ते तिथुन फुट ॲन्ड ड्रग्स

डिपार्टमेंट आणि कलेक्टर ऑफिस ठरवते. त्यामुळे कुठलाही टँकर परस्पर कोणतेही महापालिकेचे आयुक्त किंवा कुठलेही सन्मा. सदस्य इकडे तिकडे वळवू शकत नाही. कारण तिथुन...............

तारा घरत :-

वसई विरार वरुन येते त्यावेळी दादागीरी होते असे मी ऐकलेले आहे.

मा. आयुक्त :-

नाही मॅडम, तशी कुणाला परस्पर दादागिरी करता येत नाही. काही वेळा असे घळते की समजा १२ के.एल. चा टँकर आहे आणि फार शोर्टेज आले तर एक टँकर दोन ठिकाणी निम्मा निम्मा दिला जातो. किंवा टँकर दुसरा टँकर यायला समजा १२ तासाचा वेळ आहे आणि ऑक्सीजन समजा ४ तास पुरेल तर अशा केसमध्ये एक टँकर दोन महापालिकेला विभागुन दिला जातो. त्यांच्या त्यांच्या आवश्यकते नुसार. त्यामुळे परस्पर पळवापळवी किंवा कोणी दादागीरी करणे किंवा कोणी परस्पर नेणे अशी आयुक्त किंवा कुठलेही पदाधिकारी करु शकत नाही. कुठलेच महापालिकेचे ह्याचे पुर्ण नियंत्रण फुट अँड ड्रग्स आणि जिल्हाधिकारी यांचे आहे. हे राज्यात सर्वच ठिकाणी आहे.

तारा घरत :-

मी काय सांगते, आपल्या नगरपालिकेच्या हॉस्पीटलमध्ये असलेले पेशंट आपण प्राईव्हेटला पाठवतो त्यानंतर त्यांना इंजेक्शनची गरज असते ती आपल्याकडून मागितल्यावर ती आपल्याकडून मिळत नाही. प्राईव्हेटलाही तसेच होते. पण आपल्याकडे इंजेक्शन असली तरी सुध्दा ते त्यांना देत नाही असे का? आपण पाठविलेले पेशंट असतात प्राईव्हेटला.

मा. महापौर :-

वाघमारे साहेब असे काही होते का?

मा. आयुक्त :-

मिच उत्तर देतो असे कुठल्याही प्रकारचे एकही केसमध्ये काही घडलेले नाही मॅडम. आणि आपण ज्याठिकाणी पेशंट पाठवलेत आणि त्याला इंजेक्शन महापालिका देत नाही असे कुठल्याही केस मध्ये घडलेले नाही.

तारा घरत :-

नाही, आपल्याकडून प्राईव्हेटकडे पाठवतो मग आपल्याकडून इंजेक्शन ते सांगतात निदान इंजेक्शन तरी द्या प्राईव्हेट मध्ये आम्हा जरी पाठवले. ते मिळतच नाही.

मा. आयुक्त :-

मॅडम परत एकदा नमुद करतो, की रेमडेसिवीर इंजेक्शनचा विषय आहे एकदा फक्त ४०० इंजेक्शन आपल्याला मिळालेले आहेत. आपण एक तारखे पासुन जवळ पास १० ते ११ हजार इंजेक्शनची मागणी आहे. ११ हजार इंजेक्शन पैकी फक्त आपल्याला ४०० इंजेक्शन एका कंपनी कडून सुरुवातीच्या ऐप्रिलच्या पहिला आठवड्यात मिळालेले होते. आणि २०० इंजेक्शन फार भांडा भांडी झाल्या नंतर ठाणे सिव्हील हॉस्पीटल वरुन मिळालेली होती. त्यानंतर आज दिनांका पर्यंत एकही इंजेक्शन मिळालेले नाही.

तारा घरत :-

एवढी गरज असताना आपल्याला इंजेक्शन पुरेसे मिळत नाही. त्यावर काही केले पाहिजे.

मा. महापौर :-

मॅडम, त्याच्यावर मी आपल्याला ह्यापुर्वी नमुद केलेले आहे की आपण डेली ज्या ज्या कंपन्यांना वर्कऑर्डर दिले आहेत त्या कंपन्यांना डेली फोन करतो. त्यांना ई-मेल टाकतो त्यांच्या संपर्कात आहोत. फुट अँड ड्रग्स डिपाटमेंटचा हाफकीन इंस्टीटयुट महाराष्ट्र राज्य शासनाचे आहे. त्यांच्याकडून येणयासाठी त्यांच्या संपर्कात आहोत.

तारा घरत :-

आता मिळालीत का?

मा. आयुक्त :-

अद्याप मिळालेले नाहीत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संपर्कात आहोत, आरोग्य विभागाच्या संपर्कात आहोत. आता जिल्हाधिकारी यांनी ह्या एक दोन दिवसात देण्यासाठी प्रत्येक इंजेक्शनला कॅपीन सिस्टीम केलेली आहे. कॅपीन सिस्टीम केल्या नंतर जिल्हाधिकारी यांच्याकडून ती यादी जाहिर होतील. खाजगी हॉस्पीटलच्या बाबतीत बोलत आहे. आणि जी यादी जिल्हाधिकारी जाहिर करतील तो डिस्ट्रीब्युटर जेवढे जिल्हाधिकारी सांगतील त्या खाजगी दवाखान्याच्या पेशंट नुसार तेवढे इंजेक्शन तो डिस्ट्रीब्युटर डायरेक्ट त्या हॉस्पीटलला देणार. महापालिकेच्या बाबतीत बोलायचे झाले तर आपल्याला राज्य शासनाकडून इंजेक्शन हाफकीन कडून मिळणार आहेत परंतु अद्याप पर्यंत हाफकीन कडून एकही इंजेक्शन आलेले नाही. किंबहूना आज सकाळी आम्ही फोन केला होता. रात्री जाताना ९-१० वाजता ऑफिस वरुन फोन केला होता. अद्याप पर्यंत आपल्याला आलेले नाही. मी जिल्हाधिकारी साहेबांशी पण संपर्क केलेला आहे, आरोग्य विभागाशी पण केलेला आहे. आपल्या प्रयत्नात कसुर कुठल्याही प्रकारचे नाही. आणि आता प्राईव्हेटमध्ये एक दोन दिवसात इंजेक्शन द्यायला सुरुवात होईल असे समजण्यात येत आहे. त्याच बरोबर आपण पण पाठपुरावा करतो की जेव्हा प्राईव्हेटला डिस्ट्रीब्युट करेल तेव्हा महापालिकांना पण द्या. एवढेच काय आपण प्राईव्हेट मधले ऐन्जीओ सी.एस.आर. मधून देणारे जे डोनर्स असतात त्यांच्या मार्फत पण काय आपल्याला कुठुन इंजेक्शन मिळतील का म्हणून सुध्दा प्रयत्न करतोय. परंतु इंजेक्शन वर पुर्ण जे कंट्रोल आहे रेमडेसिवीर वर हे फुड अँड ड्रग्स डिपार्टमेंटचे आहे. त्यामध्ये खाजगीत कुठे मिळत नाही कुठल्या मेडिकल स्टोअर ला मिळत नाही. किंवा असे नाही की दुसऱ्या ठिकाणी मिळते तर ह्या महापालिकेत मिळत नाही. फक्त आपण आपल्या क्षेत्रापुरते मर्यादीत असतो. आणि त्यामुळे आपल्याला वाटते की हे इंजेक्शन कसे काय कुठे मिळत नाही. आपण जे म्हणतात आपल्या ज्या भावना आहेत तशाच भावना आमच्या पण प्रशासनाकडून पुढे आहेत. आमच्याकडून त्याच प्रकारच्या पाठपूरावा आहे. परंतु अद्याप पर्यंत शासनाकडून इंजेक्शन आलेले नाहीत.

तारा घरत :-

आपल्याकडे इंजेक्शन नसताना पण आपण लिहून देतो जा इंजेक्शन घेऊन या.

मा. आयुक्त :-

ह्या बाबत आपली जी सुचना आहे त्यानुसार आम्ही परवा दिवशी मिटींग घेतली कालही घेतलेली आहे. जोपर्यंत आपल्याकडे इंजेक्शन उपलबध होणार नाहीत तोपर्यंत नातेवाईकात गैरसमज पसरु नये म्हणून तशा प्रकारचे एकही इंजेक्शना बाबत प्रिस्क्रीप्शन लिहून दिले जाणार नाही अशा सुचना प्रशासना मार्फत डॉक्टरांना देण्यात आलेल्या आहेत.

मा. महापौर :-

ठिक आहे. सन्मा. नगरसेविका मिरा देवी मॅडम तुम्ही बोला.

मिरादेवी यादव :-

मॅडम मै आपकी परवानगी से बोल रही हूँ, अभी फोन करो तो डॉक्टर का फोन स्वीचऑफ रहता है, सिस्टर को फोन करो तो सिस्टर बोलती है डॉ. पडवळ को फोन करो उनका मोबाईल स्विच ऑफ रेहता है और कही पेशंट जाते है जाने के बाद उनको बोला जाता है बेड खाली नही, आय.सी.ओ. खाली नही, व्हेंटीलेटर खाली नही, उनके पास कुछ हेही नही तो लोग जाये कहा? सब मिरा भाईंदर के नगरसेवक यही चाहते है की हम बोले हम आपको शिकायत करे पर शिकायत करे किस से? शिकायत के बाद भी कोई रिझन उनको नही मिल रहा है हम लोग जो चुन के दिये है कही मुसीबत है उनको सुनने के लिये और हम सुनाने जाते है तो हमारा कोई सुनता नही है फिर मतलब क्या है की हम

खाली महासभा मै हम बैठे है शिकायत करे बस यही हमारा चलता रहेगा क्या, लोगो की सेवा जब हम करने के लिये बैठे है मै तो यह चाहती हूॅ की दिल से सेवा करे नही तो फिर इसके बाद प्रशासन ऐसे ही हाथ उपर कर दे तो हमारे पास कुछ नही तो लोग जाये कहा?

मा. महापौर :-

ठिक है मॅडम आपको प्रशासन की और से जवाब मिलेगा । सन्मा. नगरसेविका हेतल परमारजी आपण बोला.

हेतल परमार :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते, ८ तारखेला मी कोविड पॉझिटीव्ह आलेली. आणि पॉझिटीव्ह आल्या नंतर मी लगेच प्रमोद महाजनमध्ये ॲडमिट झाले. १० तारखेला मला सिस्टरचा फोन येतो की आपण पॉझिटीव्ह आहेत आपल्या घरी यायचे आहे कीट देण्यासाठी. म्हणजे २ दिवसा पर्यंत त्यांना हे माहित नसते की आम्ही पॉझिटीव्ह होऊन कुठे गेलो आहे की नाही गेलो. फक्त त्यांनी तिथे रिपोर्ट काढायचे नंतर आम्ही घरी आहोत किंवा आम्ही फिरतोय किंवा कार करतोय मग हे पॉझिटीव्ह वगैरे पालिकेतर्फे आपण करतो मोहिम राबवतो त्याच्या अर्थ काय? दुसरी गोष्ट ही की माझी फॅमिलीला पण मी समोरुन सांगितले की तुम्ही जावून टेस्ट करा बाकी तिथुन पालिकेतर्फे जे आपण पहिला करत होतो सगळ्या फॅमिलिला आपण टेस्ट करायला सांगत होतो तसे काही आपल्या पालिकेतर्फे तसे काही होत नाही. दुसरी गोष्ट मी तिकडे गेल्या नंतर त्याच दिवशी माझे ब्लड टेस्ट करण्यात आले सेकेंड डे मला त्याचा रिपोर्ट भेटला रिपोर्ट मध्ये बरोबर नाही आल्या नंतर दोन दिवसा नंतर १० तारखेला परत माझा रिपोर्ट घेण्यात आला. ते रिपोर्ट मी १० तारखे नंतर १६ तारखेला घरी आली तोपर्यंत रिपोर्ट आला नव्हता. माझे हे म्हणणे आहे की आपण जेव्हा जातो तेव्हा ब्लड टेस्ट करण्यात आला, किंवा एक्सरे घेण्यात आले, किंवा जे काही टेस्ट तिकडे झाले त्याचे रिपोर्ट जेव्हा आम्ही घरी जातो तेव्हा आम्हाला द्यायला पाहिजे. आणि त्यांनी फक्त त्यांचे आपल्या एका सिंगल पेज वर रिपोर्ट कार्ड फक्त देतात. डिच्चार्ज कार्ड त्याच्या पेक्षा तुम्ही तो डिचार्ज कार्ड सारखा काही तरी तुम्ही तुमच्याकडे ते ठेवावे आणि रिपोर्ट आम्हाला द्यावा कारण सपोज आम्ही घरी आल्या नंतर आमची परत तब्येत बिघडली तर आम्हाला परत दुसऱ्या जागेवर ट्रीटमेंट स्टार्ट करायची आहे तर आम्ही तो रिपोर्ट दाखवू शकतो. आता मी काल फोन केलेला की माझा रिपोर्ट आतापर्यंत आलेला नाही १० तारखेला घेतलेला. परत आर.टी.पी.सी.आर. पण घेतलेली आहे १०-११ तारखेला. त्या आर.टी.पी.सी.आर. चा पण रिपोर्ट आलेला नाही की निगेटीव्ह आली की पॉझिटीव्ह किंवा काय. तर ते सगळे रिपोर्ट येतात की नाही येतात येतात तर तुमच्याकडे तुम्ही का ठेवतात? पेशंट लोकांना द्यायला पाहिजे. तो ऐक्सरे तुम्ही ठेऊन काय करणार आहेत? आणि ब्लड चेक रिपोर्ट तुम्ही ठेवून काय करणार आहेत? दुसरी गोष्ट ही आहे की मला तिथे गेल्या नंतर हाथावर इथे बघु शकतात हाथाच्या इथे ग्रीन अजुन आहेत. आज मला १३-१४ दिवसत झाले अजुन पण तिथे तुम्हाला दिसत असेल तिथे सुई टाकताना ते लोकांनी आऊट करुन टाकलेले. त्याच्या नंतर मला सेकेंड सुई इथे लावली इथे लावल्या नंतर तिथे पण आऊट झाले तिथे पण खुप प्रमाणात ग्रीन झाले. ही सभा संपल्या नंतर आपल्या गृपमध्ये मी फोटो टाकणार आहे. नंतर तिसरी मला इथे टाकली ह्या राईट हॅंडमध्ये तिसरी टाकली. ते प्रकरण चालत गेल्या नंतर मला माहित पडली की तिथे काही शिकाऊ लोक आहेत. ज्यांना ट्रेनिंग नाही. सर्वात पहिली प्रोसेस ती असते मॅडम आपण ॲडमिट होतो त्याच्या नंतरची पहिली प्रोसेस ही असते. ह्याच्या थ्रु आपल्याला इंजेक्शन जातात. आता मला रोजचे ७-७ इंजेक्शन लागायचे आणि ते आऊट असताना ते मला काही माहिती नाही आणि ते आऊट मध्ये पण त्यांनी इंजेक्शन लावले. आणि ते इंजेक्शन घेतांना मला खुप त्रास झाला. एक एक इंजेक्शन घ्यायला मला १०-१०, १५-१५ मिनिटे लागलेली आहेत. मला असे वाटलेले की मी जीवंत येते की नाही बाहेर असे झाले. म्हणजे लोक थोडे से घाबरतात. म्हणजे त्यांना काही नसते ते ट्रीटमेंटने बरे होऊ शकतात. ट्रीटमेंट चांगली

आहे. डॉक्टर पण दोन दोन तासात येतात. बघतात वगैरे सगळे आहे क्लिनिंग पण चांगली आहे तिकडे सगळी साफसफाई पण चांगली आहे. एक फुडचा आपल्याकडे टाईमिंग आहे तो जरा व्यवस्थित नाही. १०:३०, ११:३० ला नाष्टा येतो. २ वाजता जेवन येते. आणि रात्री ११:०० वाजता जेवन येते ही प्रमोद महाजनची सिस्टीम थोडी चेंज करायला पाहिजे कारण तिथे काही काही लोक आहेत त्यांच्या टीफिन येतो पण ज्यांच्या टीफिन येत नाही त्यांना खायला वेळेवर भेटत नाही ते गोळी खातात ९-९ गोळी असतात सकाळी पण आणि रात्री पण गोळी खातात. तर त्यांना पण ते जेवण वेळेवर भेटणे गरजेचे आहे. ही फक्त माझी नोंद घ्यावी.

मा. महापौर :-

नक्की. प्रशासनाने सन्मा. नगरसेविका हेतल परमार मॅडमने काही सुचना केलेल्या आहेत. आणि सदर ठिकाणी शिकाऊ नर्स जर असतील तर त्यांना पहिल्यांदा ट्रेनिंग द्या. आणि ट्रेन नर्स तिकडे उपलबध करुन द्या. जेणे करुन अशा पध्दतीचे ट्रीटमेंट रुग्नांवरती होणार नाही. सन्मा. नगरसेविका प्रभात ताई पाटील तुम्ही बोला.

हेतल परमार :-

मॅडम ते रिपोर्ट भेटणार आहेत की नाही त्याचे नंतर स्पष्टीकरण करण्यात यावे.

मा. महापौर :-

आयुक्त साहेब सर्वांच्या विषयावरती परत खुलासा करणार आहेत.

प्रभात पाटील :-

प्रशासनाच्या सगळ्या अडचणी ऐकल्या. म्हणजे त्यांनी अडचणी सांगितल्या आणि आम्ही ऐकून घेतल्या म्हणजे तो उतारा नाही हे लक्षात घ्या. पहिली गोष्ट तर माझी ही आहे की तुम्ही जो टेंभा हॉस्पीटलला दोन इंचार्ज नेमलेले आहेत एक पानपट्टे साहेब आणि एक प्रकाश जाधव तर जो नंबर तुम्ही नोट केलेला आहे  तो तुम्ही स्व:त लावून बघा तो लागतोय का. एक तर तो नंबर चुकीचा आहे किंवा ते उचलत नाही त्यांनी त्यांचा मोबाईल नंबर स्वीच ऑफ करुन ठेवलेला आहे. हि एक गोष्ट आणि दुसरी गोष्ट अशी आहे की तुमच्याकडे ऑक्सीजन बेड नाहीत, तुमच्याकडे आय.सी.यु. बेड नाहीत, तुम्ही आलेल्या प्रत्येक पेशंटला न्याय दिला पाहिजे म्हग तुम्ही त्यांना वरांड्यात झोपवा. तुम्ही त्यांना स्ट्रेचरवर जागा द्या. तुमच्याकडून एकही पेशंट रिटर्न गेला नाही पाहिजे. कमित कमी मी ॲडमिट आहे आणि माझ्यावर उपचार होणार आहे ही त्या पेशंटला दिलासा देणारी खुप मोठी गोष्ट आहे. तुमच्याकडे जागा नाही म्हणून तुम्ही दुसरीकडे नेणे दुसरीकडे जागा नाही तिसऱ्या वेळेला त्या पेशंटची वरात काढायची आहे का? मरणाच्या दारात गेलेल्या पेशंटला जागा नाही जागा नाही म्हणून शहरभर फिरवायचे हे कुठच्याही औचित्याला धरुन नाही. ही एक गोष्ट दुसरी गोष्ट मगाशी रिटा शहा मॅडमने सांगितले की तुमच्याकडे ३ हजार रेमडेसिवीरची मागणी तुमच्या फाईल वरती ३ दिवस पडून होती ती तुम्ही का ठेवली? आज तेवढे इंजेक्शन आपल्याकडे आले असते तर आपण त्याच्यामध्ये मिरा भाईंदरचे सगळे पेशंट बघु शकलो असतो. ते का ठेवले ते मला कळले नाही. आता त्यांनी सांगितले की किंमत जास्त होती अहो जिथे तुम्ही १२ करोड रुपये मातीमध्ये घातलेना हो तिथे बाळासाहेब ठाकरेला. ते पैसे मातीत गेले. कोणाचे पैसे गेले लोकांच्या कराचे पैसे गेले ना नागरीकांचे गेले मी ह्या शहराची नगारीक आहे माझेही गेले ना. ते १२ करोड तुम्ही असेच मातीत घालवता आणि तुम्हाला ३००-४०० रुपये इंजेक्शनवर जास्त मागितले तर तुम्ही ते इंजेक्शन घेत नाही. हा कोणता न्या आहे? लाखो रुपये करोडो रुपये किमतीचा माणसाच्या जीव तुम्ही घालवता त्या इंजेक्शन साठी. आता तुम्ही सगळे सांगतात ऑक्सीजन आपल्याकडे नाही ऑक्सीजन येणार आहे, रेमडेसिवीर येणार आहे महापौर मॅडम रेमडेसिवीर मध्ये सांगते, रेमडेसिवीर सगळे कलेक्टर सेंट्रलाईज झाले आहे. कलेक्टरला ऑथॅरीटी गेली ते म्हणतील त्या त्या हॉस्पीटलला ते पुरवठा करणार आहेत. माझा पाहण्यात असे आले आहे म्हणजे माझा मोबाईलवर आले आहे तुमच्याकडूनच डिस्प्ले झालेले आहे, की

तुम्ही चार ठिकाणी चार हॉस्पीटलला मिरा भाईंदरमध्ये परमिशन दिली आहे ते चारही हॉस्पीटल खाजगी हॉस्पीटल आहेत. त्याच्यामध्ये का मिरा भाईंदरचे टेंभा हॉस्पीटल नाही? ह्याचा आपण काही विचार केला आहे का? पहिला तर ती लस रेमडेसिवीर पहिला आपल्याकडे यायला पाहिजे. आणि नसेल येत तर त्यांच्या हॉस्पीटल मधुन पाचवे नाव आपले टाकून घ्या. पहिल्यांदा सगळ्यात जास्त पेशंट आपल्याकडे येतात. पहिल्या सगळ्या पेशंटला सुविधा देण्याचे काम आपले आहे. पहिली प्रायोरीटी टेंभाला असली पाहिजे किंवा तुमच्या महापालिकेला असली पाहिजे. तर तुम्ही त्याच्यामध्ये पहिले नाव आपले टाकून घ्या. आणि ती मागणी करा की आम्हाला. आणि दुसरी गोष्ट सगळ्यात महत्वाची जे सगळ्यांच्या बोलण्यातुन आले ते की मला पेशंट टेंभाला न्यायचा आहे म्हणून मी पानपट्टेंना फोन करते मी प्रकाश जाधवांना फोन करते मी परवळना फोन करते, पडवळ सांगतात तुम्ही तिथे दिपा आहे त्या दिपा डॉक्टर त्यांना फोन करा, कोणी सांगते अंजली पाटील यांना फोन करा, आणि तिथे सगळे जे डॉक्टर आहेत तुम्ही आयत्या वेळेवर घेतलेले आहेत ज्या डॉक्टरांचा आमचा काही संबंध नाही संपर्क नाही त्यांचे नंबर नाही मग त्यांचे नंबर शोधायचे. त्यांना फोन करायचा किंवा आपला माणूस तिथे गेलेला असतो पेशंट जवळ त्यांना सांगायचे त्या डॉक्टरांना जरा फोन दे मला बोलायचे आहे तो डॉक्टर तिथुन समोरुन सांगतो कोण प्रभात ताई पाटील आम्ही ओळखत नाही. आम्हाला भरपुर कामे आहेत. आम्ही तुमच्याशी बोलताना आम्हाला त्यांच्याशी नाही बोलायचे मॅडम हे काय आहे? हा आमचा अपमान आहे तो अपमान सोडून द्या मरणाच्या दारात पेशंट असताना मान अपमान आम्ही धरुन बसत नाही. परंतु त्या पेशंटला माझ्यासाठी प्रभातताई फोन करतात किंवा जोत्स्ना हस्नाळे फोन करतात हा एक आशेचा किरण असतो. तो आशेचा किरण तुम्ही मावळू देऊ नका. त्यांना प्रत्येक फोन रिसिव्ह करायला सांगा. तुमचा वॉर रुमचा नंबर आहे तो तर कधी कोणी उचलतच नाही. कशाला ते वॉर रुम ठेवलेले आहेत? ते वॉर रुम नाही ते डेथ रुम झाले आहेत. ह्या सगळ्या गोष्टींचा विचार आणि उत्तरे मला मिळाली पाहिजेत. आणि हे चालु करा त्याशिवाय ह्या शहरातील परिस्थिती पुर्ववत होणार नाही.

मा. महापौर :-

ठिक आहे. प्रशासनाने सन्मा. नगरसेविका प्रभात ताई पाटील ह्यांनी केलेल्या सुचनांचा विचार करावा. आणि त्यांनी ज्या विषयाबाबत खुलासा मागितलेला आहे त्याचा खुलासा आपण नंतर करावा. सन्मा. नगरसेवक व गटनेते जुबेर ईनामदार जी आपण बोला.

जुबेर इनामदार :-

धंन्यवाद महापौर मॅडम, महापौर मॅडम, खरतर हा देश पुर्ण त्या कोरोना मुळे हा आणीबाणीचा विषय झालेला आहे. प्रशासन कमी पडतो कुठे त्याला बरीच कारणे असु शकतात. आपण ४ दिवस आधिच मला वाटते बैठक गटनेत्यांची पदाधिकाऱ्यांची घेतली. आपण त्याच्यावर बरीच चर्चा केली. ३ तास म्हणजे ३ ते ६ वाजल्या पासुन आपण त्याच्यावर चर्चा केली. आणि सन्मा. आयुक्त महोदयांनी आपल्याला २६ स्तरची माहिती ऑक्सीजन हा एक प्रकार मोठा आपल्याला त्याला त्याच्या कमतरते मुळे आपण आज रुग्नांना भरती करु शकत नाही किंवा त्यांना औषध उपचार हा होत नाही. हा त्याला मुळ कारण खरतर आयुक्तांनी आपल्याला समजुन सांगितले. आणि ते आपल्याला पटले सुध्दा कारण ही वस्तुस्थिती पुर्ण म्हणजे आपल्या महाराष्ट्राची समोर आहे. आयुक्त महोदय, त्यादिवशी आपली ह्या विषयावर चर्चा झाली. ते आपले डॅशबोर्ड अपडेटेड नाहीत. खाजगी रुग्नालयाचे माहिती डॅशबोर्ड वर ते लोक सादर करत नसतील तर आपण समजु शकतो. महापौर मॅडम, महापालिकेचा डॅशबोर्ड आज सुध्दा आप्पासाहेब मध्ये नॉन आय.सी.यु. ६ प्रमोद महाजनमध्ये आय.सी.यु. ०२ आणि नॉन आय.सी.यु. १७ असे रिकामे दाखवत आहेत आता तुम्ही फोन करुन एक पेशंट मला तिथे पाठवून दाखवा. कालची गोष्ट आहे माझी मामी आहे तिला ऑक्सीजनची कमतरता आहे घरी तिला मी काल बाटला पोहचवला काल शेवटी. तिला मी प्रयत्न करत होतो ॲडमिट करायला शेवटी वाघमारे साहेबांना

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, हे आपण पुर्वी पण क्वारंटाईनला नातेवाईकांचा विषय आणि डेथ एकडे टेंभ्याला झाली किंवा इकडे झाली आणि बाकीचे कोणी नातेवाईक त्या वेळेला त्याच्या विधीसाठी उपलबध नसायचे आणि त्यांना शेवटचे दर्शन तरी मिळावे आणि त्यांना अंत्यविधीसाठी उपस्थित राहता यावे म्हणून त्यांना आपण जे क्वारंटाईनला जे असायचे त्यांना आपण पी.पी. किट्स द्यायचो आणि त्यांना आपल्या अॅब्युलन्स मधुन अंत्यविधीसाठी उपस्थित राहण्यासाठी घेऊन जायचो आणि परत त्यांना क्वारंटाईनमध्ये आणुन ठेवायचो. ते पी.पी. आपल्याच मार्फत दिले जायचे मॅडम. त्यांना क्वारंटाईनच्या हयाला थोडे आपण सांगायचो की तुम्ही विकत घेऊन या.

शानु गोहील :-

अच्छा आपल्या मार्फत बरोबर आहे.

डॉ. पडवळ :-

यस मॅडम.

शानु गोहील :-

आयुक्त साहेब, महापौर मॅडम, आता दोन दिवस आधीची गोष्ट मी तुम्हाला सांगते, आपल्याकडे एक कोविडची डेथबॉडी आली त्यांना काय सांगितले की तुम्ही तो जो जाळण्याचे काम प्रोसिजर जो करतो आपला कर्मचारी त्याने सांगितले की मला पी.पी.ई. किट्स पाहिजे तर त्यांनी फोन केला आपला एस.आय. ला त्यांनी मला सांगितले की हम लोगो को दे नही रहे है तर मी एस.आय. ला फोन केला तर एस.आय. ने मला सांगितले की आरोग्य विभाग आम्हाला प्रोव्हाईड करतो. आम्ही आरोग्य विभागाला कॉल केला तर लहाने साहेबांचा फोन आला की आम्ही देतो परंतु जेव्हा तो कर्मचारी जाळतो त्यावेळी त्यांनी विचार त्याला त्या लोकांनी पी.पी.ई. किट् प्रोव्हाईड केले नाही. काल परत तशी सेम प्रोसिजर झाली आणि त्यांनी फोन केला कोणी राहूल भोईर आपल्या आरोग्य विभागामध्ये अधिकारी/कर्मचारी आहे त्याने फोन वर काही सांगिते नाही हा पी.पी.ई. किट ना असे बोलून त्याने फोन ठेवला.....................................

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या दिप्ती भट मॅडम बोला.

दिप्ती भट :-

महापौर मॅडम, माझे एक सांगणे होते आणि थँक्यु मला टाईम दिल्या बद्दल परंतु मला थोडा १० मिनिटे द्या मला मला बोलायचे आहे कारण की आमच्या तिथे दोन डेथ झाली. एक आयुक्त साहेबांना सांगायचे आहे १० तारखेला एक पेशंट पाठविलेले तिथे त्यांनी टेंभामध्ये घेतले नाही त्यांनी नकार दिला. ते प्रमोद महाजनमध्ये पण गेले त्यांना तिथे पण नाही भेटला मग आम्ही त्यांना शताब्दीमध्ये नेले. शताब्दीमध्ये नेल्या नंतर त्यांचा दुसऱ्याच दिवशी डेथ झाली. कारण त्यांना

टाईमावरती ट्रीटमेंट भेटली नाही मॅडम. मला एक सांगायचे आहे की आयुक्त साहेबांनी आम्हाला सगळ्यांना विश्वासात घेऊन आपण कुठला पण निर्णय घेत आहेत तर तो प्लिज घ्या. कारण पहिलेचे आयुक्त होते ते आम्हाला डिटेल्स सांगायचे डिटेल्स पण भेटायची. जे काही प्रॉब्लेम्स होते ते आम्ही त्यांच्या बरोबर पण शेयर करत होतो. आपण मिटींग लावली म्हणून आम्ही बोलू शकलो. आणि आम्ही जेव्हा त्यांच्याकडे भेटायला जातो तेव्हा ते आम्हाला भेटत नाही ते कुठेना कुठे मिटींगमध्ये असतात. ते शहराचे बघतात म्हणून ते साहजिकच आहे. दुसर की त्यांनी सांगितले चकोर डॉक्टर तर त्यांनी पण बिलकुल फोन नाही उचलले. मी त्यांना ३ वेळा फोन केला. बच्छाव डॉक्टर त्यांना ३ वेळा फोन केले त्यांनी पण फोन उचललेला नाही. आणि दुसरे आम्ही असे रोजचे पेशंट पाठवतो लोक टॅक्स भरतात म्हणून आमच्याकडे ते नाही ते प्रश्न करतात आणि बोलतात. आमचे एकच आहे की ते पालिकेकडे करतो. पण ते लोक आमच्याकडे जेवढे पण कंम्पेड करतात आम्ही त्यांना उत्तर काय द्यायचे? आपण जे पेपर पाठवले की जिल्हाधिकारीकडून मेडिकल मध्ये हे भेटणार ते भेटणार आता चोरी नाही होणार इंजेक्शनची एक पण फोन लागत नाही. उलट लोकांनी आम्हाला असे प्रशन केले. मॅडम पेपर कशाला पाठवता ॲक्शन काय घेताय ते तुम्ही आता सांगा. म्हणजे असे लोकांचे जे रागात आहेत त्यांचे बोलणे आम्ही एकटे ऐकायचे. आणि दुसरे १७ तारखेला मी एक पेशंट पाठवला त्याच्याकडे पण सेम शानु गोहील मॅडमने सांगितल्या प्रमाणे त्यांच्याकडून लिहून घेतले. आणि त्यांच्याकडून लिहून घेतल्या नंतर अशी गोष्ट आहे की अँब्युलन्स त्यांना सांगितले की त्यांना व्हेंटीलेटर लागेल म्हणून मॅडम तुम्ही दुसऱ्या हॉस्पीटलला घेऊन जा. मी बोलली ॲटलिस्ट तुम्ही ऑक्सीजन तर लावा त्यांनी ऑक्सीजन लावले आणि त्यांनी दुसरी नव जीवन मध्ये पहिला बेड खाली होत होता तर नवजीवन मध्ये त्यांनी कोशिश केली ३ वाजेचा त्यांनी टाईमिंग दिला. आपल्याकडून साहेब अँब्युलन्स मागितली त्यांनी बोलले अँब्युलन्स मुंबईच्या बाहेर गेली आहे ऑक्सीजन वाली ॲब्युलन्स त्यांना दिली नाही अर्धा तास लेट झाला ती लेट झाल्या मुळे ते पेशंट तेथुन बेड गेले. आणि आता रोज मी निलोफर मॅडम डॉक्टर मी त्यांच्या बरोबर बोलली त्यांना रोज सांगतात तुम्ही दुसरी बेडची व्यवस्था करा. माणसाला तुम्ही तिथे असतात त्यांना सांगतात पण लोकांना प्राईव्हेट मध्ये बेड भेटायला तर पाहिजे ती चुक त्यांची होती की आणि मी ॲब्युलन्ससाठी मला सांगितले अर्धा तासाने मी फोन केला लगेच १० मिनीटामध्ये ॲब्युलन्स आली. पण त्यावेळी त्यांचा बेड निघुन गेला. म्हणजे हे आम्ही फोन करणार ती गोष्ट वेगळी पब्लिक जाते तर डायरेक्ट तुम्ही कराना. आम्हीच त्यांना पाठवतोय. म्हणजे तुम्ही वाट बघायची की कोणी लोकप्रतिनिधी आयुक्तला कंम्प्लेड करेल तर ते आपल्याला कंम्प्लेड करतील तरच आपण त्यांचे उत्तर द्यायचे त्यांना अँब्युलन्स द्यायची. आणि आपल्याकडे अँब्युलन्स नसेल तर त्या वाढवा. आपण राज्य सरकारला सांगत नाही की आम्हाला ऑक्सीजनची अँब्युलन्स पाहिजे. आता तुम्ही मिटींगला जातात मधी मी ऐकले की आपण मुख्यमंत्री बरोबर मिटींग पण केली तर आपण आपल्या शहराची जी परिस्थिती आहे ती तुम्ही त्यांना सांगितली नव्हती का? एवढे आपले हॉल बनविलेले आहेत ते हॉल कशासाठी बनविलेले आहेत? जे सन्मा. रिटा शहा मॅडम आहेत, प्रभात ताई पाटील, आपले उपमहापौर साहेब मी त्यांच्याशी सहमत आहे त्यांनी जे सांगितले ते चुकीचे नाही. वारंवार आम्ही पत्र व्यवहार केलेले आहेत. आणि अर्धा अर्धा तास अँब्युलन्समध्ये माणसांना ठेवतात जेव्हा ते बी.फोर.यु. संस्थाला मी फोन करते कुठे कुठे आम्ही नाही पोहचू शकत मग त्यांनी मदत केली मग त्या माणसाला ऑक्सीजन भेटले. ॲटलीस नाही तर मी त्यांना काल रिक्वेस्ट केली की त्याला चेअर वरती बसवून तरी ऑक्सीजन द्या. ऑक्सीजन नाही म्हणून त्याला आहे म्हणून तुमच्याकडे कोणी येते. प्राईव्हेट संस्था जेवढ्या वाटत आहेत आम्ही तेवढ्यांना घरी मदत करतोय असे नाही की त्यांना मदत नाही. आणि एवढ पालिकेचा फर्ज आहे की परिस्थिती अशी आहे आणि लोक पत्रामध्ये पण साहेब दोन दिवसा अगोदर आलेले की टाटा जी स्टील कंपनी आहे त्यांनी फ्री मध्ये २०० ते ३०० टन ऑक्सीजन फ्री मध्ये देत आहे. तर मग आपल्या

पालिकेने गव्हर्नमेंटने हॉस्पीटलाने पण मांग करावी की आपल्या शहराला लांब ठेवलय. राज्यामध्ये आपले शहर नाही मिरा भाईंदर ? कारण एवढी परिस्थिती गंभीर आहे आम्हाला लोकांना उत्तर देणेस भारी पडलेले आहे. ह्या प्रश्नांचे प्लिज मला उत्तर देण्यात यावे. अँब्युलन्स साठी असे का झाले आणि शानु मॅडम बोलले तिथे पण आमच्या लोकांकडून लिहून घेतलेले आहे की तुम्हाला काय झाले तर तुमची जबाबदारी असेल. हे असे वागत आहेत ते कुठे तरी चुकीचे वागत आहेत. आणि लोक टेंश्न मध्ये असतात. माझे हे दोनच प्रश्न होते आणि दुसरी रिक्वेस्ट ह्या परिस्थितीमध्ये मी जे सांगते गेल्या वेळेला पण आमचे तिकडचे लोक ३-३, ४-४ फुट पाण्यामध्ये भरलेले अजुन आमच्या वॉर्ड मधले जेवढे क्रॉसिंग बाकी आहे तर रिक्वेस्ट आहे की जाफरी खाळी कडे क्रॉसिंग करण्यात यावी नाही तर परत ह्या कोविडमुळे अजुन उभरलेलो नाही लोकांची नौकरी नाही आणि परत ह्या वर्षी पाणी भरणार परत आमचे वॉर्डवाले ग्राऊंड फ्लोअर वरचे ह्यामध्ये डुबणार आहेत. एवढे दोन शब्द सांगायचे होते आपण टाईम दिल्या बद्दल धंन्यवाद.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटीलजी आपण बोला.

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम धंन्यवाद, पहिला तर मी आपल्या आयुक्त साहेबांचे अभिनंदन करतो. आपल्या आयुक्त साहेबांकडे ग्रास्मिंग पॉवर जबरदस्त आहे. त्यांची एक्सप्रेशन पॉवर सुध्दा ही अगदी उत्तम आहे. त्यांच्या कामाचा स्पीड आणि कामाचा अवाकाही जबरदस्त आहे. मी त्यांना धंन्यवाद देतो. आयुक्त साहेब हे सगळे करत असताना एक चांगले काम केले. त्या दिवशी शहरामध्ये ऑक्सीजन नव्हते आणि सी.एम. साहेबांची कॅबिनेट शुरु होती सगळे कॅबिनेट मिनिश्टर उभे होते त्यांचे डिस्कशन चालु होते विरोधी पक्षनेते प्रविण भाऊ त्यांचे डिस्कशन चालु होते. आणि अशा मिटींगमध्ये सुध्दा आपण डायरेक्ट सी.एम. साहेबांना फोन करुन मिरा भाईंदर शहरासाठी जी ऑक्सीजनची कमतरता होती ती ऑक्सीजनची कमतरता आपण सॉल्व्ह केली त्याबद्दल त्यांचे मनापासुन आणि मिरा भाईंदर शहराकडून अभिनंदन. पण साहेब ज्या स्पीडली आपण हे काम केले त्या स्पीडने ह्या मिरा भाईंदर शहराच्या रुग्नांकरीता लागणारे रेमडेसिवीर इंजेक्शन यामध्ये प्रशासनाने अतिशय दिरंगाई केली. मा. महापौर मॅडम, मी महापौर नरेश गिते साहेबांशी बोललो ठाणे महानगरपालिके तर्फे रुग्नालयामध्ये ॲडमिट रुग्नांना ठाणे महानगरपालिका रेमडेसिवीर इंजेक्शन प्रोव्हाईज करते. त्यानंतर मी वसई विरार चे महापौर प्रविन शेट्टी साहेबांशी बोललो त्यांनी सुध्दा सांगितले की वसई विरारच्या हॉस्पीटलमध्ये ॲडमिट असलेले रुग्नांना महापालिके तर्फे रेमडेसिवीर इंजेक्शन वितरण झाले. नंतर अशी महानगरपालिकेला सुध्दा बोललो त्यांनी सुध्दा सांगितले आम्ही रेमडेसिवीर इंजेक्शन प्रोव्हाईड करतो. जर मिरा भाईंदरच्या शहरातील सर्व महानगपालिका रुग्नालयांना जर आपण रेमडेसिवीर इंजेक्श्न जर प्रोव्हाईज करतो तर मिरा भाईंदर का प्रोव्हाईड करु शकत नाही? पालिकेतर्फे ३० ऐप्रिलला वर्कऑर्डर दिली तर ३१ मार्चला पुन्हा ६ ऐप्रिलला दुसऱ्या कंपनीला वर्कऑर्डर दिली. १५ ऐप्रिलला त्या कंपनीला सांगितले की आम्ही ह्या रेट ने देऊ शकत नाही आपण त्यांना १६ ऐप्रिलला पुन्हा वर्कऑर्डर दिली. आज मॅडम २० तारीख होऊन गेली पण आजतागयत रेमडेसिवीर इंजेक्शन आपण पालिकेतल्या ॲडमिट असलेल्या रुग्नांना इंजेक्शन उपलब्ध करु शकतो नाही मॅडम ही अत्यंत खेदाची बाब आहे. आपले आयुक्त साहेब डायरेक्ट सी.एम. साहेबांशी बोलतात आणि त्यांचे संबंध खुप चांगले आहेत. मंत्रालयात त्यांचा अनुभव चांगला आहे. परंतु रेमडेसिवीर इंजेक्शनचे एक काम पालिकेतर्फे आपण करु शकलो नाही ही अत्यंत दुर्देवाची बाब आहे. मॅडम दुसरी गोष्ट मी तुम्हाला सांगतो की कलेक्टर हा सुध्दा शासनाचाच एक भाग आहे शासनाचाच प्रतिनिधी आहे. प्राईव्हेट रुग्नालयामध्ये रेमडेसिवीर इंजेक्शन मिळते परंतु महापालिकेच्या रुग्नालयामध्ये ॲडमिट असलेल्या रुग्नांना रेमडेसिवीर इंजेक्शन दिले जात नाही. माझी आयुक्त साहेब आपणास विनंती आहे आपण डायरेक्ट सी.एम. साहेबांशी बोलू

शकता तर कलेक्टर तुम्ही त्या हिशेबाने इझिली तुम्ही बोलु शकता पण आपण त्यांना आजतागयत बालले नाहीत असे मला तरी वाटते. जी माहिती मी घेतली आहे. पालिके तर्फे त्यांना का पत्र दिले गेले? साहेब जर जिल्हाधिकारी साहेब प्राईव्हेट रुग्नालयाला देऊ शकतात तर आपल्याला का नाही. आणि साहेब इतर महानगरपालिका आपण प्रत्येक महानगरपालिकेचा उदाहरण देत आहेत म्हणजे प्रशासन नेहमी म्हणते की ह्या महापालिकेत तसे आहे ह्या महापालिकेत तसे आहे इतर बाजुच्या महापालिकेमध्ये रेमडेसिवीर इंजेक्शन दिले जाते तर आपल्याकडे का दिले जात नाही साहेब ही अतिशय चुकीची बाब आहे. दुसरी गोष्ट आपण रुग्नांना ॲडमिट करण्या करीता एक वॉर रुम, डॅश बोर्ड, कॉल सेंटर हे सगळे सुरु केले. मी स्व:त महापौर मॅडम डॅश बोर्ड मध्ये माझा नावाची ऐंट्री केली डी.एम. पाटील मला बेड पाहिजे म्हणून परंतु ५ दिवस होऊन गेले आजतागयत मला तिकडून क्लेरीफिकेशन आले नाही की आपल्यासाठी तिथे बेड आहे. मॅडम जर अशी दुर्देवी बाब हे कसे आहे, कोविड वन मध्ये मॅडम आपल्या महानगरपालिके तर्फे संपुर्ण प्राईव्हेट हॉस्पीटलचे बेड सिस केले होते आपण ते घेतले होते आणि आपल्या तर्फे ते बेड आपण भरले होते. आणि कोविड टू ची परिस्थिती अतिशय गंभीर असताना सुध्दा आपण तसे करु शकलेलो नाही. आज प्राईव्हेट रुग्नालय बिंदास्त आपली मनमर्जी करतात आणि मिरा भाईंदरातल्या जनतेची छेडछाळ करतात. मॅडम ह्याला कुठेतरी आपले प्रशासन चुकते असे मला तरी वाटते. ॲक्च्युअली ही आणीबाणीचा काळ आहे ह्या आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये आपण सगळे सिस करु शकतो आणि सगळे ताब्यात करु शकतो आणि आपली यंत्रणा राबवून आपण ते काम करु शकतो. ह्या शहरामध्ये मोठ मोठे चांगले चांगले हॉस्पीटल आहेत, त्यांच्याकडे ते अजुनही वेळ वाढवू शकतात. परंतु ते बेड वाढवत नाहीत. प्रशासनाने कुठेतरी ह्याच्यामध्ये थोडीशी दिरंगाई केली असे मला तरी वाटते. म्हणून माझी विनंती आहे मॅडम आपण बेड वाढवू शकतो परंतु आपण ते बेड वाढवू शकत नाही. दुसरी गोष्ट मॅडम, चार दिवसा पुर्वी आपण मिटींग घेतली त्या मिटींगमध्ये आपण सांगितले प्लाझमासाठी आपण कॅम्प प्रत्येक विभागात आपण अरेंज केला पाहिजे परंतु आजतागायत झाले नाही. आता मला मेडिकल वाल्याचा फोन आला त्यांनी सांगितले  परवाना डिपार्टमेंटने परवाना साठी कॅम्प आयोजित केला आहे अरे परवाना कॅम्प काय हे इमपॉर्टंट आहे की प्लाझमाचा कॅम्प इंमपॉर्टंट आहे. मॅडम चार दिवसा पुर्वी आपण दिलेली ऑर्डर आजतागायत प्रशासन त्याचे इप्लिमिटेशन करत नाही. साहेब प्लाझमा अभावी किती तरी लोकांना जीवन दान मिळते. आणि दुसरी गोष्ट मी सांगतो मॅडम, प्लाझमासाठी इथे जे लागते म्हणजे रक्तातुन आपण जो प्लाझमा काढतो त्याच्यासाठी आपल्या ब्लड बँकेमध्ये फक्त एकच मशीन आहे. सकाळी नऊ वाजता गेलेला ब्लड म्हणजे प्लाझमा डोनेशन करणाऱ्या माणसाला दुपारी ३ वाजता घरी जायला मिळाले. ६ तास त्याला लागले. जर ६-६ तास लागत असतील तर डोनर कसा जाणार मॅडम तिथे? तर ही सुध्दा व्यवस्था पालिके तर्फे आपण केली पाहिजे. पण आपण ती करु शकलो नाही. मी वाघमारे साहेबांचे धंन्यवाद करतो मॅडम कोविड वन मध्ये ज्या ज्या आपल्या पालिका अधिकाऱ्यांनी डॉक्टरांनी जे काम केले आहे आपण त्यांचे अभिनंदन केले महासभेमध्ये. का केले कारण त्यांनी चांगले काम केले. पण आता ह्या कोविड टू मध्ये आपण कुठेतरी कमी पडतोय असे मला तरी वाटते. म्हणून माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे जसे आपण फास्ट आहात तसेच आपले अधिनस्त कर्मचारी ह्यांनी पण फास्ट राहिले पाहिजे. मॅडम, महानगरपालिका ॲक्ट ६७ (३) खाली आपण त्यांना फुल परवानगी दिली. आणि तसे आपण त्यांना फ्री हॅन्ड दिले आहे प्रशासनाला की त्यांनी त्या प्रमाणे खर्च केला पाहिजे. परंतु त्या कलमा मध्ये एक अशी नोंद आहे की आयुक्ताने केलेली कारवाई त्याबाबतची कारणे आणि अधिनियमात चालु असलेल्या अर्थसंक्लपामध्ये समाविष्ठ नसल्येला खर्च अशा कारणाने झाला असेल किंवा होण्याचा संभव असेल तो खर्च ह्या विषयी प्रतिवृत्त स्थायी समिती व महापालिका ह्यांच्याकडे ताबडतोब पाठवले पाहिजे. मॅडम आज एक वर्ष होत आले आणि आता महासभेला हे प्रतिवृत्त सादर झाले. ही किती चांगली बाब आहे मॅडम बघा. कलमा मध्ये लिहीलेले आहे महासभेने

स्टँडींगने त्यांना फुल अधिकार दिले परंतु त्या अधिकाराचा कुठेतरी त्यांनी दुरुपयोग केला असे मला तरी वाटते. अशा भरपुर निविदा आहेत मॅडम त्यांना न मुदतवाढ देऊन सुध्दा त्यांना आपण मुदतवाढ दिलेली आहे. आणि अशा भरपुर नंतर मुदतवाढ आपण कायम सुध्दा केलेल्या आहेत. म्हणजे प्रशासनाला सगळे लोकप्रतिनिधी आणि नगरसेवक फुल सपोर्ट करत असतात. परंतु कोविड मध्ये अतिशय ही पालिकेच्या काही अधिऱ्यांनी दिरंगाई केलेली आहे. दुसरी गोष्ट आताच सन्मा. सदस्यांनी सांगितली की बाजारा मुळे अक्षरशा गर्दी झाली आहे. महापौर मॅडम दोन्ही साईटला म्हणजे बाजारामध्ये पण गर्दी झाली आणि मेन रस्तयावरती जिथे मुख्य रस्त्यावरती बाजार भरत होता तिथेही बिंदास फेरीवाले आजही बाजार मांडून बसत आहेत.  पाहिजे असेल तर तुम्ही उदया सकाळी कुठेन जाता तुम्ही त्या सेटलाईटवरुन चेक करु शकतात. आपण जिथे बाजार भरविलेला आहे तिथे पण गर्दी आहे आणि रस्त्यावरती पण गर्दी आहे म्हणजे प्रशासनाचा कुठेही ताळमेळ दिसत नाही. आणि आपल्या ज्या प्रमोद महाजन हॉलमध्ये आप्पासाहेब धर्माधिकारी हॉलमध्ये आपण ज्या संस्थेला आपण डॉक्टरर्स आणि नर्सेस प्रोव्हाईड करण्याला जे काम दिले होते तुम्ही जर मॅडम बघितले तर त्या करारनाम्या प्रमाणे त्यांनी त्याची सेवा दिली नाही. मॅडम काही कंडीशन टाकून दिल्यात की एवढा पेशंट एवढ्या बेड्सवरती आपल्याला हे डॉक्टर पाहिजेत एवढ्या डॉक्टर वरती आपल्याला त्या लेव्हलचा डॉक्टर पाहिजे आपल्याला त्याच्यासाठी एवढ्या नर्सेस पाहिजे, त्याच्यासाठी एवढा स्टाफ पाहिजे, परंतु अजिबात ती संस्थेने मागे कोविड वन मध्ये सुध्दा काम चांगले केले नाही. आणि आताही ते काम चांगले करत नाही. आता हेतल मॅडमने सांगितले की जी सुई लावलेली आहे ती सुई कशी लावलेली आहे म्हणजे त्यांच्याकडे ट्रेन स्टाफ आजिबात नाही. आमदार मॅडमने सांगितले आपण आरोप प्रत्यारोप करत नाही. परंतु जे आपल्या निदर्शनास आलेले आहे ते निदर्शनास आणुन देणेसाठीचे काम आपले आहे. आणि ते सर्व लोकप्रतिनिधी आज ते निदर्शनास आणुन दिलेले आहे. आता मॅडम प्रतिनियुक्ती बाबत स्थायी समितीने बोलले आहे, मॅडम आपल्या राज्य शासनाचा जी.आर. मध्ये क्लियरकट म्हटलेले आहे की ५० टक्के जी उपायुक्तांची जागा आहे ती ५० टक्के महापालिकेतुन भरावी आणि ५० टक्के राज्य शासनाकडून मागविणार आहोत. ४ उपायुक्त आहेत मॅडम तर वास्तविक दोनच उपायुक्त राज्य शासनाकडून घेतले पाहिजे आणि दोन उपायुक्त आपल्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यामधुन भरले पाहिजेत. पण तसे ते केलेले नाही. आणि आज आपण मॅडम मी तुम्हाला आणखीन एक गोष्ट सांगतो आपल्या पालिकेतर्फे जो आपण खर्च केलेला आहे त्या खर्चाची जी लिस्ट मी काढलेली आहे महापौर मॅडम त्याच्यातले काही दोन चार मुद्दे मी तुम्हाला सांगतो. आपण ते रेंट दिले आहेत मॅडम आपण खुर्चासाठी रेंट दिले आहेत त्या एका खुर्चीला आपण रेंट दिले आहे ६०० रुपये त्या खुर्चीची किंमत आजच्या मार्केटमध्ये फक्त ३०० रुपये आहे. म्हणजे आपण डबल रेंट दिलेला आहे. मॅडम तुम्हाला दुसरी गोष्ट सांगतो जो फॅन आहे त्याची किंमत दिढ ते दोन हजार रुपये आहे त्याचे आपण रेंट दिला आहे जवळ जवळ ५५०० रुपये. एक आणखीन सांगतो मॅडम, आय.व्ही. स्टँडची किंमत आहे हार्डली  ५०० ते ६०० रुपये परंतु त्याचा आपण रेंट दिला आहे ८ हजार रुपये. फुट सॅनिटायझर आपण ते मशीन दाबतो सॅनिटायझरचे त्याची किंमत हार्डली ९०० ते ९५० आहे त्याचे आपण दिले आहेत २२०० रुपये. मॅडम अशा अनेक ठिकाणी महापालिकेतर्फे त्यांना डबल टीबल पैसे दिले आहेत. हे फक्त आपल्या निदर्शनास आणुन देत आहे. आम्ही कोणावरती आरोप करत नाही. परंतु अधिकारी पण एक माणूस आहे. त्यांनी पण एक विचार केला पाहिजे की आपण एखादी वस्तु रेंटवरत देतो तर ती देतांना आपण ॲक्च्युअल विकत घेतली आणि रेंटवर दिली. ह्या दोघांचा ताळमेळ केला पाहिजे. ६७ (३) काय म्हणते मॅडम नियम काय म्हणतो की तातडीच्या वेळी त्यांनी विकत घेतले पाहिजे. पण समजा आपल्याला एक पाण्याची बॉटल लागत असेल फक्त आणि आपल्याकडे वेळ नाही तर आपण ह्या बॉटलला इमिजिऐटली आपली समजा १० हजारची रिकमेंड आहे हजार आपण विकत घेतले ताबडतोब बाकीच्या साठी आपण ती निविदा काढली पाहिजे. पण मॅडम तसे केले नाही. आपण ह्या सगळ्या

बाटल्या डायरेक्ट ऑनदिस्पॅाट मागुन घेतल्या आणि म्हणून आपल्याला ही कॉस्टली पडल्या. अशा अनेक उदाहरणे मॅडम आज जर तुम्ही बघितले ह्या निविदेमध्ये किती आढळून आलेले आहेत. म्हणून माझी महापौर मॅडम आपल्याला विनंती आहे की मागे स्थायी समिती मध्ये हा विषय निघाला आणि स्थायी समिती सभापतीने आणि सगळ्या सदस्यांनी कमिटी गठीत केली, आणि त्या कमिटीने ह्याची चौकशी करायचे ठरविले. सगळी इंक्वायरी करायचे ठरविले. सगळ्यांचा अहवाल मागविला परंतु त्यांना सुध्दा प्रॉपर इंफॉरमेशन दिली गेली नाही. म्हणून महापौर मॅडम मी असा एक ठराव मांडत आहे कोविडचा प्रादुर्भाव शहरात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर पसरत असून महापालिकेच्या सर्व सन्मा. सदस्यांनी कोविड साथरोग विषयाबाबत प्रशासनाच्या गैरव्यवस्थैबाबत व कार्यपध्दतीबाबत तीव्र भावना व्यक्त केलेल्या असुन वृत्तपत्रातही प्रशासनाच्या गलथान कारभारबाबत उदाहरणासहित अनेक बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत.

यावरुन कोविड साथ रोग रोखणेकामी रुग्णांवर उपचार करणेकरीता केलेल्या उपाययोजनेमध्ये गैरप्रकार व निष्काळजीपणा झाल्याचे दिसून येत आहे. महापालिकेतर्फे करोडो रुपये खर्च करुनही सध्या रुग्णांवर केल्या जाणाऱ्या उपचार पध्दती / साधन सामग्री खरेदी करणे, निविदा मागविणे त्यास मंजुरी देणे इ. गैरप्रकार झाल्याचे निर्दशनास आल्याने त्याची चौकशी करणेकरीता मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली सर्व पक्षीय गटनेते व पदाधिकारी यांची समिती गठीत करावी.

तसेच मा. स्थायी समितीने देखील या विषयाबाबत समिती गठीत केली आहे त्या समितीचाही मा.महापौरांनी केलेल्या समितीमध्ये समाविष्ट करुन त्या समितीने सर्वप्रकारची माहिती घेवून झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करुन संपूर्ण अहवाल मा. महासभेमध्ये सादर करावा तोपर्यंत ही मा. महासभा तहकुब करावी.

तसेच शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या तीन उपायुक्तांपैकी एका उपायुक्तांना महापालिकेच्या सेवेतून मुक्त करुन मनपाच्या आस्थापनेवरील वरीष्ठ सहाय्य आयुक्तांस उपायुक्त पदी नियुक्त करावे असा ठराव मांडत आहे.

प्रशांत दळवी :-

माझे अनुमोदन आहे.

गिता जैन :-

महपौर मॅडम, मला वाटते ही चर्चा चालु आहे. विषय पत्रिकेवर नसताना आपण ठराव मांडू शकत नाही.

ध्रवकिशोर पाटील :-

मॅडम मी तहकुबची सुचना मांडलेली आहे. आणि तहकुबचा ठराव मांडलेला आहे.

गिता जैन :-

त्यात बरेच विषय टाकलेले आहेत.

ध्रुवकिशोर पाटील :-

आज त्या मिटींगमध्ये मॅडम प्रतिनियुक्ती वरती बहूतेक सदस्यांनी चर्चा केलेली आहे. मॅडम ऑलरेडी ह्या जी.आर. मध्ये तसे नमुद आहे.

गिता जैन :-

तुम्ही ठराव फक्त तहकूबसाठी मांडू शकता.

ध्रुवकिशोर पाटील :-

मी तहकुबची सुचना मांडलेली आहे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या जैन मॅडम सचिव साहेब आपल्याला खुलासा करतील की असा ठराव करता येतो का तहकुबीचा.

नगर सचिव :-

सभा तहकुबीचा ठराव करता येतो.

ध्रुवकिशोर पाटील :-

सभा तहकुब केली मॅडम मी. ठराव मांडलेला आहे. आणि सभागृहनेते प्रशांत दळवी साहेबांनी अनुमोदन दिलेले आहे.

गिता जैन :-

तुम्ही तहकुबीच्या ठरावात दुसरे विषय कशाला टाकले?

निलम ढवण :-

फक्त तहकुब करण्याची परवानगी सचिवांनी दिलेली आहे महापौर मॅडम.

मा. महापौर :-

परमिशन नाही सभा तहकुब करता येते का असा प्रशन उपस्थित झाला. तेव्हा त्यांना मी खुलासा करायला सांगितले की करता येते का. तर त्यांनी म्हटले हो करता येते. मला असे वाटते की सभागृहाच्या भावना आपण सर्वच नगरसेवकांना बोलायची इच्छा होती. त्यापैकी बऱ्याचशा नगरसेवकांनी आपले मत ह्या ठिकाणी मौखीक रुपाने इथे मांडले. परंतु बरेचशे सदस्य असे आहे की त्यांना अजुनही बोलायचे आहे पण ते बोलले नाहीत आणि त्यांना मिरा भाईंदर शहरामध्ये ही आता सध्याची करोनाची परिस्थिती जी आहे ती आपण सर्वजन अनुभवतोय प्रत्येक्ष रुपाने पाहतोय. प्रशासन काम करत आहे परंतु प्रशासनाला काय अडचणी आहेत किंवा प्रशासन कुठे कमी पडते किंवा त्यांना कुठे कशा पध्दतीने हाताळणी करताना काय अडचणी होत आहेत तर मला असे वाटते आयुक्ताने ह्या संदर्भामध्ये एक खुलासा देणे फार गरजेचे आहे. आयुक्त साहेब आपण ह्या संदर्भामध्ये एक शोर्टमध्ये खुलासा द्या की आपल्याला काय अडचण होत आहे मिरा भाईंदर शहरामध्ये ऑक्सीजनच्या बद्दल रेमडेसिवीर इंजेक्शनच्या बद्दल..............

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी तहकुबची सुचना किंवा ठराव मांडलेला आहे. त्यामध्ये आता खुलासा देण्याची काय गरज नाही. दुसरा विषय असा आहे प्रत्येक सदस्याने आपली व्यथा किंवा आपले दु:ख, किंवा आपली पिडा, त्या लोकप्रतिनिधीचा हिशेबाने ह्या महासभेमध्ये मांडलेले आहेत ह्यासाठी मांडलेले आहेत की ते सारखे सारखे त्यांच्या आयुष्यामध्ये किंवा यथास्थितीमध्ये ते घडलेले आहे. आणि कोणाची ती तक्रार नाही, कोणावर आक्षेप नाही, कोणावर आरोप प्रतिआरोप नाही फक्त जे घडले आहे तेच प्रत्येक नगरसेवकांनी किंवा सदस्यांनी ते मांडलेले आहे. ह्या अनुषंगाने मला असे वाटते की कोविडचा विषय हा गरजेचा होता मला असे वाटते की कोविडचा विषयावर प्रशासनाने अधिकाऱ्यांनी प्रत्येकाने त्याच्यावर लक्ष देण्यात यावे. जितपर्यंत मला असे वाटते की शहरासाठी हा गरजेचे आहे तितपर्यंत कुठलाही विषय नघेता ध्रुवकिशोर पाटीलांनी जी सुचना मांडलेली आहे किंवा तो ठराव मांडलेला आहे तहकुब विषयावर ते तहकुब करण्यात यावे असे निवेदन मी पण करत आहे महापौर मॅडम. आणि महापौर मॅडम तुम्हाला असे निवेदन आहे की ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी जे तहकुबसाठी मांडलेले आहे त्यावर तुम्ही घोषना देऊन ते आदेश देण्यात यावे असे तुम्हाला निवेदन आहे.

गिता जैन :-

महापौर मॅडम तुमचा तो अधिकार आहे का तहकुब करायचे असेल तर.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडमचा पुर्ण अधिकार आहे तहकुब करण्याचा. कोणाचा अधिकार नाही तो महापौर महोदयाचा अधिकार असतात. महापौर आपल्या अधिकाराखाली ते करु शकतात.

मा. आयुक्त :-

आयुक्त म्हणून मला जर खुलासा प्रशासनाला करायचा नसेल तर..............

मा. उपमहापौर :-

सर खुलासाचा वेळ नाही.

मा. आयुक्त :-

मी तुमच्याशी बोलत नाही मी महापौर मॅडमशी बोलत आहे.

मा. उपमहापौर :-

मी महापौर मॅडमला जवाब देतोय.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, कोविडची काय स्थिती आहे ही प्रशासनाला आपली बाजु मांडण्याची संधी देण्यात यावी महापौर मॅडम आपल्याला विनंती आहे. कोविडवर सर्व सन्मा. सदस्यांचा भावना तिव्र भावना संताप जे काही ह्या शहरात चालले आहे ह्यात तुमची बाजु तुम्ही मला सांगितली आहे. परंतु कोविडवर ह्या शहरात प्रशासन काय करत आहे प्रशासनाला अडचणी कोणत्या प्रशासनाची चांगली बाजु कोणत्या परंतु ..............

ध्रुवकिशोर पाटील :-

प्रत्येक सदस्यांनी आपल्या भावना तिव्रपणे व्यक्त केल्या आहेत. आयुक्तांना उदाहरणा सहीत स्पष्टिकरण सहीत आपण काही गोष्टी सांगितल्या आहेत.

मा. आयुक्त :-

प्रशासनाचे म्हणणे ऐकून घ्यावे अशी माझी महापौर मॅडमला विनंती आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

मॅडम एक सिम्पल लॉजीक आहे, जर रेमडेसिवीर इंजेक्शन आयुक्त साहेब खुलासा करत आहेत बाजुच्या महानगरपालिकेमध्ये जर रेमडेसिवीर इंजेक्श्न पेंशंटला भेटत आहे......................

मा. महापौर :-

त्या बाबतच ते बोलत आहेत. त्याबाबतच ते उत्तर देत आहेत. रेमडेसिवीरच्या इंजेक्शनच्या बाबतीत चालले आहे त्याबद्दल त्यांना उत्तर देऊ देतना.

निलम ढवण :-

आम्हाला आयुक्त साहेबांचे स्पष्टीकरण ऐकायचे आहे.

मा. महापौर :-

हो ते ऐकायला मिळेल.

मा. आयुक्त :-

सुरुवातीला मी रेमडेसिवीर वर येतो नंतर ऑक्सीजनवर येतो आणि शहरात असणाऱ्या सदस्थिती कोविडची काय त्याबद्दल देतो. सर्व सन्मा. सदस्यांच्या मी भावना ऐकलेल्या आहेत आणि ज्यांच्या ज्यांच्या सुचना आहेत त्या सर्व सुचना मी स्व:त लिहून घेतलेल्या आहेत. त्या सुचने नुसार जे जे महापालिकेला करणे शक्य आहे आणि जे करणार आहोत ते सर्व सदस्यांच्या सुचना लक्षात घेऊन आपण त्याची अंमलबजावणी करणार आहोत. परत परत दोनच गोष्टीकडे आपण येत आहोत रेमडेसिवीर मग रेमडेसिवीर साठी टास्क फोर्स चे मेडिकलचे काय म्हणजे वर्ड हेल्थ ऑर्गनाईजेशन काय म्हणते, ह्या खोलात न जाता रेमडेसिवीर मिळत नाही म्हणून हा पॅनिकनेस आहे. सन्मा. सर्व सदस्यांनी रेमडेसिवीरचा मुद्दा काढला. प्रविण पाटील साहेबांनी सांगितले, दळवी साहेबांनी सांगितले, त्यांनतर ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी सांगितले अलमोस्ट बोललेले सर्व सदस्यांनी गिता जैन मॅडमने सांगितला त्या नंतर उर्वरित सर्व सदस्यांनी अलमोस्ट ऑल याचा उल्लेख केला. दोन तीन गोष्टी प्रामुख्याने आहेत डॅशबोर्ड आहे रियल टाईमचा, आणि रेमडेसिवीर आहे. मी प्रथमत: रेमडेसिवीर बद्दल

बोलतो त्यात एक उल्लेख केला होता की १५-१६ तारखेला अजुन एक सन्मा. सदस्यांनी उल्लेख केला होता मला वाटते रिटा शहा मॅडमने की प्रशासनाकडून आपल्याला उशीर केला आणि पैसे जास्त गेले असते तरी परंतु तुम्ही का घेतले नही. आपण १ ऐप्रिलला प्रशासना मार्फत ज्या आपल्याला रेमडेसिवीर पुरविणाऱ्या कंपन्या आहेत त्यांना आपण ऑर्डर दिलेली होती. त्यानंतर शासनाने दिलेले जे गाईड लाईन आहेत जी.आर आहे. शासनाच्या जी.आर. नुसार त्याची किंमत ठरलेली असते. ती किंम्मत कमी करण्याचा वाढविण्याचा कोणताही अधिकार कुठल्याही महापालिकेच्या आयुक्तांना जिल्हाधिकाऱ्यांना किंवा कुठल्याही सरकारी अधिकाऱ्यांना वेगळा नसतो. तर वेगळा रेट आपण देऊन घ्यायचे म्हटले तरी ते शक्य नसते कारण तो जी.आर. च्या नियमानुसार चालले आहे आणि आतापर्यंतची औषध खरेदी त्याच नियमाने चाललेली आहे. १५ तारखेला रात्री शासनाचा सुधारीत जी.आर. आला की ६६६ रुपये जी त्याची किंमत होती ती शासनाने वाढवून १५०० केली. १४६८ प्लस जी.एस.टी. त्यानुसार १५ तारखेला रात्री आपल्याला जी.आर. प्राप्त झाल्या नंतर १६ तारखेला  सकाळी आपली रिव्हाईज ऑर्डर प्लेस केलेली आहे. जवळ पास आपण ५ हजार आणि ६ हजार असे ११ हजार केलेले आहे. आतापर्यंत फक्त त्यापैकी ४०० आपल्याला मिळालेले आहेत. आणि त्यानंतर प्रशानाच्या वतीने अगोदर पण उल्लेख केला परत करतो जिल्हाधिकाऱ्यांकडे आपण कळवतो, आरोग्य विभागाकडे कळवतो हाफकीनला कळवतो आणि ज्या कंपन्यांना आपण पुर्वी ऑर्डर दिली ज्यांच्याकडून आपण पुर्वी घेत होतो  त्यांनाही आपण रोज पाठपूरावा करतोय. स्व:त मी फोन वर काँटॅक्ट करतोय आपण ई-मेल पाठवतो, मी जिल्हाधिकाऱ्यांशी बोलतो, अजुन एक सन्मा. सदस्यांनी सांगितले होते की तुम्ही जिल्हाधिकाऱ्यांशी का बोलत नाही तर मी जिल्हाधिकाऱ्यांशी बोलतो. जिल्हाधिकाऱ्यांशी दिवसात कमित कमी ८-१० वेळा बोलणे  होते मेनली ऑक्सीजन आणि रेमडेसिवीर ह्या दोनच गोष्टी ज्या आहेत की ज्या महापालिका प्रशानाच्या हातात नाहीत . आणि जे सन्मा. सदस्य बोलतात माझा माहितीने त्यांना ही सर्व स्थिती माहित आहे. त्यांनी आणखीन एक उल्लेख केला वसई विरार किंवा ठाणेला मिळत असेल तर आपल्याला का मिळत नाही. जसे मंध्यंतरी आपल्याला ४०० कंपनीने आणि २०० सिव्हील हॉस्पीटल असे ६०० मिळाले होते. असे कधितरी १०-१५ दिवसातुन ४००-६०० चा लॉट येतो. उदा. आता आपली मिटींग चालु आहे आणि आज आपल्याला सिव्हील हॉस्पीटलने १५० रेमडेसिवीर इंजेक्शन पाठवले. समजा आज आपण इंजेक्शन घेतली आणि समजा वसई विरारला नसली तर वसई विरारचे पदाधिकारी किंवा अधिकारी म्हणणार मग मिरा भाईंदरला आज इंजेक्शन दिले आणि आपल्याकडे कसे नाही, हे रोटेशन पध्दतीने जसे जसे इंजेक्शन उपलबध होतात तेव्हा त्या त्या महापालिकेला देण्याचे काम एफ.डी.ए. आणि जिल्हाधिकारी करतात. तसे जिल्हाधिकारी पेक्षा एफ.डी.ए. हा महत्वाचा रोल आहे. ही कुठलीही खाजगी कंपनीकडून परस्पर कुठल्याही महापालिकेला घेता येत नाही. किंवा जिल्हाधिकाऱ्यांना नाही. फुड अँड ड्रग्स डिपार्टमेंट प्लस जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली याचे होते. याची आपण एकदा नाही तर दोन दा खातरजमा करावी. आणि रेमडेसिवीर आणण्यासाठी महापालिका पैसाची बचत करत नाही  वेळेत कुठलेही अपव्ययय्य करत नाही. १५ तारखेला रात्री ८-९ वाजता जी.आर. प्राप्त झाला. तो १६ तारखेला सकाळी १० वाजता आपली ऑर्डर गेलेली होती याची कृपया नोंद घ्यावी. ऑक्सीजन आणि रेमडेसिवीर बाबत तुमच्या पेक्षा मी अतिशय सेन्सीटीव्ह आहे ही प्लिज नोंद घ्या. आणि मगाशी मी एकदा उल्लेख केला होता की ऑक्सीजनची गरज आहे ठाणे जिल्ह्याला ३०० मेट्रीक टन आणि मिळतो आहे १८०. म्हणजे आपल्याला ६० टक्के ऑक्सीजन आता पुरवतात ४० टक्के कमी पडतात. तर मग आपण म्हणाल की ४० टक्के कमी असताना पेशंट कसे जगतात मग आता आपण जे ऑक्सीजन पळवला म्हणतो रात्री जागावे लागते गाडी अँब्युलन्स टाईप आणावे लागते ते का आणावे लागते २४ तासाचे ऑक्सीजन एकदा आपल्याला मिळत नाही किंवा ५० तासाचा ४८ तासाचा मिळत नाही. आपल्याला १२ तास १५ तास पुरेल असा रोटेशन पध्दतीने ऑक्सीजन दिला जातो. बऱ्याचदा आणीबाणीच्या काळात तर एक ऑक्सीजनचा टँक दोन महापालिकेला दिला जातो.

तीन चार दिवसा पुर्वी ठाणे महापालिकेतील १५ टनातला आपल्याला ५ टन आणि त्यांना १० दिला होता. त्याच्या दोन तीन दिवसा पुर्वी वसई विरारला ८ टन आणि आल्याला ७ टन दिला होता. बऱ्याचदा असे महापालिकेला एक टँकर एका वेळेला देणे शक्य होत नाही तर दोघात विभागुन दिला जातो. तेच आपल्या ऑक्सीजन सिलेंडरची स्थिती आहे. आपल्या बरोबर ऑक्सीजनची तिर्वता आपल्या प्राईव्हेट हॉस्पीटलला पण आहे. वसई विरार किंवा भोईसरने ऑक्सीजन देणे बंद केले हे सर्वस्वी सर्व डॉक्टर लोकांना खाजगी हॉस्पीटलचे माहित आहे आणि माझा माहितीने हे तुम्हालाही माहित असो. आपण अंबरनाथ ह्या सारख्या ठिकाणी वाशी, तळोजा अशा ठिकाणी संपर्क साधुन त्याठिकाणाहून सुध्दा आपल्या बरोबर आपल्या खाजगी हॉस्पीटला पण ऑक्सीजन मिळेल ह्यासाठी करतो. आपण फॅसिलेटर आहोत. खाजगी हॉस्पीटला ऑक्सीजन पुरवणे तशी महापालिकेची जबाबदारी नाही. तरी सुध्दा नागरीक ह्या शहरातला आहे ह्या शहरातला नागरीक वाचला पाहिजे तो तुमचा माझा घरातला असु शकतो नातेवाईक असु शकतो. म्हणून हे प्रशासन दिवस रात्र ऑक्सीजन आणि रेमडेसिवीर साठी काम करत असते. ऑक्सीजन आणि रेमडेसिवीर ह्या दोन गोष्टी अशा आहेत त्याच्यावर पुर्ण शासनाचे नियंत्रण आहे. आणि शासनाचे रोटेशन पध्दतीने वाटप होते. महापालिकेला अधिकार असते. महापालिकेच्या हातात असते तरी नक्कीच याच्या पेक्षा आणखीन जास्त आणले असते जास्त सेंटर सुरु केले असते. आजही आपल्याकडे जवळपास २५० बेड तयार आहेत. आणखीन एक सन्मा सदस्यांनी उल्लेख केला होता की आपला आप्पासाहेब धर्माधिकारी बंद आहे, अजिबात नाही आप्पासाहेब धर्माधिकारी जेवढी क्षमता मगच्या वेळी कोविड फेज फ्रस्ट मध्ये होती ती शंभर टक्के क्षमतेने चालत आहे. आपण उलट त्याच्यात १०० बेड पहिल्या मजल्यावर अॅड केलेले आहेत आणि ते सुध्दा रेडी आहेत. परंतु ऑक्सीजनच्या येत्या तीन चार दिवसात संपेल अशी अपेक्षा आहे. जसा ऑक्सीजन सुरळीत होईल त्याच क्षणाला १०० बेड आज क्षनाला रेडी आहेत. आजही ऑक्सीजन मिळाला तर पुढचे बेड सुरु होतात. प्लस मिनाताई ठाकरेचे १६५ बेड आहेत तेही आपल्याकडे तयार आहेत. इव्हन दो एवढा क्रॅशेस असताना मिनाताई ठाकरेचे पण आपण कुलिंग ऑफ करुन त्याची टाकी भरलेली आहे. होप्स आहे की गुरुवारी ते पण हॉस्पीटल सुरु होणार आहे. ऑक्सीजनचा क्रंच हा तुम्ही तुमचा भावना मी समजु शकतो. आणि मुंबई, ठाणे, नवी मुंबई कुठेही जरी तुम्ही गेलात कुठल्याही हॉस्पीटला अगदी पंचतारांकीत हॉस्पीटल पासुन छोट्या ओ.पी.डी. पर्यंत सर्वस्वी ह्याच ठिकाणी असाच उद्रेक आहे. कोविड भाग-१ आणि २ मध्ये काय फरक आहे कोविड-१ आणि २ मध्ये हा फरक आहे की गेल्या वेळी ऑक्सीजनची कंझमशनच्या ३ ते ४ पटीने आताचे ऑक्सीजन कंझमशन जास्त आहे. मागच्या वेळी कोविडचा प्रोटोकॉल नविन होता माहित नव्हता परंतु कोविड मधली साथ येत होती त्याच्यात आपण होम आयसोलेशन करत नव्हतो. जास्तीत जास्त आपण क्वारंटाईनला ठेवायचो किंवा कोविड केअर सेंटरला ठेवायचो. तेव्हा कोविड केअर सेंटरला ऑक्सीजनची गरज आता कोविड केअर सेंटरला फक्त आपल्याकडे ६०० पेशंट आहेत. आणि जवळ पास आपले डेल्टाचे ८०० आणि हे १३०० असे २१०० पेशंटची व्यवस्था आहे. कोविड केअर सेंटरला २१०० पैकी ६०० आहेत. बाकी १४००-१५०० जागा रिक्त आहेत. तिथे कुठल्याही प्रकारची टंचाई नाही. आता जे पेशंट अॅडमिट होतात त्याच्यातला सगळ्यात महत्वाचा बदल हा आहे की पेशंट आहेत. जास्तीत जास्त ज्यांचे वय मोरदॅन ५० असे जास्त आहेत. त्यापेक्षा कमी वयाचे असलेल्यांची संख्या कमी आहे. ऑक्सीजनचे कंझमनशन ६ ते ७ लिटर पर मिनिट असले पाहिजे. हे पेशंट येतात यांचे कंझमशन १८ ते २२ लिटर पर मिनिट आहे. ६०० ची टाकी जर आपली पहिला टेंभाला आणली तर २-२, ३-३ दिवस ठिकायची. आता ती १८ ते २० तासात संपते. दुसरी गोष्ट आता आपल्या २६ मेट्रीक टन रोज ऑक्सीजन लागतो पुर्वी तो ८-९ मेट्रीक टनात आपला दिवस जायचा. थ्री टाईंम पेक्षा कंझमशन जास्त आहे. आणि राज्यात हा तुटवळा सगळीकडे आहे. ह्या महाराष्ट्र राज्य शासनाची जेवढी ऑक्सीजन पैदास करण्याची क्षमता आहे त्या पुर्ण इंडस्ट्रीज स्टॉप करुन १०० टक्के ऑक्सीजन हा फक्त कोविड आणि कोविडइत्तर रोगावरच्या पेशंटला

दिला जातो. ऑक्सीजन आपल्याकडे मागणी आहे १८०२ हजार टनाची आणि प्रॉडक्शन होत आहे आपल्याकडे १४०० ते १५०० टन. ५०० टनाचा शॉर्टेज आहे. आता काल पर्वा पुर्वी केंद्र आणि राज्य शासनाने ठरवून निर्णय देऊन ऑक्सीजन ऐक्सप्रेस सुरु केली. काही काल रिकामे कंटेनर इतर राज्यात गेले छत्तीसगढ, झारखंड इतर राज्यात. त्या ठिकाणीहून जेव्हा ऑक्सीजन सुरळीत होईल त्यावेळी ऑक्सीजनची स्थिती सुधारत जाईल. रेमडेसिवीर आणि ऑक्सीजन ह्या दोन गोष्टी अशा आहेत आपण कितीही राग व्यक्त केला संताप व्यक्त केला तरी महापौरांच्या परवानगीने बोलतो महापालिका आणि प्रशासनाच्या हातात ह्या दोन गोष्टी निर्मिती करण्याच्या किंवा परस्पर घेण्याचा हे दोन्ही अधिकार नाहीत. किवा आपण ते किंबहूना तसे करुही शकत नाही. ह्या दोन गोष्टी सोडून राहिला प्रशन कर्मचाऱ्यांचा शिस्तीचा, बेसिस्तीचा जे जे मी नोडल ऑफिसर यांना अधिकार दिलेले आहेत त्यांची ऑर्डर काढलेली आहे त्याठिकाणी कुठल्याही अधिकाऱ्यांनी तुम्हाला सगळ्यांना आश्वस्त करतो कोणत्याही अधिकाऱ्यांनी कामात कुचूराई केली तर त्यांना मी स्पेअर करणार नाही. परत एकदा मी जबाबदारीने बोलतो कोणत्याही अधिकाऱ्याने बेसिस्त वर्तन केले काम नाही केले किंवा कामात हलगर्जी पणा केला म्हणून कुठल्या पेशंटला कोविडची मदत झाली नाही असे झालेले प्रसंगी कोणाला कटू निर्णय घेऊन निलंबीत करावे लागले तरी मी मागे हटणारा अधिकारी नाही. जे जे माझ्या हाथात असेल २४ पैकी २२ तास १८ तास कम करुन आम्ही करणार. ज्या ज्या आपण सन्मा. सदस्यांनी सुचना दिल्या त्या प्रत्येक सुचनेचे पालन करणार. डॅशबोर्डचा विषय आहे तो दोन तीन दिवसा पुर्वी बऱ्यापैकी होता तो आज पहाटे पर्यंत सगळा अपडेट झालेला आहे. तसा चार्ट पण मी माझ्याकडे मागवून घेतलेला आहे. परत परत आपला चर्चेचा विषय तो रेमडेसिवीर आणि ऑक्सीजन ह्या दोन गोष्टीतली वस्तुस्थिती आपण समजुन घ्यावी. नेट वरुन बघा तुम्ही टी.व्ही. चॅनलच्या बातम्यात बघा, सगळ्या न्युज पेपरला बघा हा दोन गोष्टी मधला विशेषत: ऑक्सीजनचा विषय आहे येते ३-४ दिवसात क्लियर होईल अशी अपेक्षा आहे. ह्या कामासाठी आपण किमान ८ ते १० अधिकारी रिक्रूट केलेले आहेत. फक्त ऑक्सिजन मधील कुठल्याही प्रकारची दिरंगाई होऊ नये म्हणून. पानपट्टे साहेबा सारखा इथला अनुभवी अधिकारी आपण टेंभा हॉस्पीटला दिलेला आहे. त्यांच्या अधिपत्या खाली इतर डॉक्टर लोक काम करतात. टेंभा हॉस्पीटलमध्ये जे लोकांचे उन्नीस बीस कधी होते त्याला कारण असे आहे त्याच्यावर नियंत्रण डायरेक्ट आहे राज्य शासनाच्या आरोगय विभागाचे. आणि त्याचा भार वाहतोय मिरा भाईंदर महानगरपालिका तरीसुध्दा ते लोक काम आपल्याशी करत नाही हे गृहीत धरुन सर्व भार कामाचा असो आणि प्रसंगी सगळे औषध खरेदी असो, ऑक्सीजन असो आणि रेमडेसिवीर असो हे घेण्याचे काम ही आपली महापालिका करत आहे. बाकी ठिकाणी ठिकाणचा व्हेंटीलेटर मधला सक्सेस रेट मोजला तर १० टक्के ४ टक्के असा आहे. आपल्या टेंभ्यासारखा हॉस्पीटलचा ४० ते ५० टक्केच्या दर्म्यान आहे. राहिला प्रश्न अचान पेशंट १८-१९ रेडींगच्या पुढे गेल्या नंतर ब्रेथलेस होतो आणि अचानक त्याला आय.सी.यु. लागतो. ज्या पेशंटला आपण ऑलरेडी आय.सी.यु. दिला आहे त्याला १८,१५,२० दिवस प्रसंगी महिन्या पर्यंत त्या आय.सी.यु. मधुन काढता येत नाही. आताची जी फेज आहे जे कोविडचे म्युटेशन आहे ते बऱ्याच केसमध्ये कोविड टेस्ट ही निगेटीव्ह येते. धट्टा कट्टा पेशंट असतो कुटूंबात राहत असतो. अचानक त्याचे १०-१५ च्या पुढे रेडिंग गेल्या नंतर त्याला जेव्हा ब्रेथलेस होतो ज्या वेळेला स्वसनाला त्रास होतो तेव्हाच कळते की ह्याला काही तरी होत आहे. आणि अचानक त्याच्यामुळे रिक्वायरमेंट ऑक्सीजनची तिप्पट चौपट वाढते. आणि अचानक तो कोविड निगेटीव्ह असताना मुळे कुठूंबातील इतर सदस्यांची टेस्ट पण त्यामुळे करावी लागते आणि सगळ्यांची धावाधाव होते. मागणी आणि पुरवठ्यातील ऑक्सीजनचे प्रमाण हे अतिशय व्यस्त आहे. तुम्ही वेगवेगळ्या ठिकाणी बातमी वाचतात, काही त्यातल्या खऱ्या असतील काही ठिकाणी खोट्या असतील परंतु कोणतेही आरोप करण्यापुर्वी सुचना देण्यापुर्वी थोडी आपण पण आपल्या लेव्हलला खातरजमा केली तर अजुन चांगले राहिल. जे आपण रेमडेसिवीरच्या बाबतीत बोललेलो आहे की प्रशासनाने पैसे का वाचवले

पैसे वाचविण्याचा प्रशासनाचा तसा इरादा नाही तर आपण कोट्यावधी रुपये कोविडवर उडवत आहोत तर इंजेक्शनमध्ये किती पैसे वाचणार आहेत समजा शंभर कोटी रुपये कोविडवर खर्च केला तरी इंजेक्शन वरचे एक कोटीने काही फरक पडणार नाही. बरं इंजेक्शन नसेल तर इतर खर्चाला शुन्य अर्थ आहे याची प्रशासनाला निट जाणीव आहे. आणि प्रशासन त्या दृष्ट्रीकोणातुन तत्परतेने काम करत असते. ज्या ज्या वेळी वैद्यकिय सल्ला प्रसंगी दुसऱ्या महापालिकेतला शासनातला किंवा कुठल्याही प्राईव्हेट ऑर्गनाईजेशनचा घ्यावा लागला तरी ते आपण घेत असतो. एवढेच नाही अजुन एक मुद्दा आला होता प्राईव्हेट हॉस्पीटलची मनमानी ह्या केसमध्ये जबाबदारीने सांगतो आपल्या महापालिकेचा एक एक डॉक्टर त्यांच्या तीन तीन हॉस्पीटलवर नियंत्रणासाठी नेमलेला आहे. त्याठिकाणी तो डेली व्हिजीट करतो पेशंटची स्थिती काय ॲडमिट किती झाले त्यांनी रिलिव्ह किती केले मृत्यु किती लोकांचा झाला, झाले असल्यास त्याचे कारण काय होते, आणि बील कसे लावतो, त्याच बरोबर त्याची रेमडेसिवीर आणि ऑक्सीजनची स्थिती काय ह्या प्रमुख ५-७ मुद्यावर आपल्या महापालिकेच्या डॉक्टरांना प्रत्येक खाजगीत ३-३ हॉस्पीटची जबाबदारी दिलेली आहे. काही ठिकाणी दोन तीन चार असे दिलेले आहेत. त्यामुळे खाजगी हॉस्पीटलमध्ये नक्की काय चालले आहे पेशंटची स्थिती काय ह्यासाठी सुध्दा महापालिका बारीक लक्ष देते. किंबहूना ह्यापुर्वी इतके बारकाईने त्याच्यावर लक्ष दिलेले नवहते. कारण त्याचा मागचा उद्देश आहे की पेशंटला सेवा चांगली मिळाली पाहिजे आणि पेशंटची ट्रीटमेंट ही रिझनेबल कॉस्ट मध्ये झाली पाहिजे. वाजवी दरात झाली पाहिजे. त्यानंतर आपण जागा का वाढवत नाही अशी सुचना आली होती आपण आतापर्यंत प्राईव्हेट हॉस्पीटलची पण मिटींग घेतली २५ टक्के क्षमतेने सगळ्यांना जागा वाढविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यांना लेखी सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याच बरोबर नविन २० हॉस्पीटलला २-३ दिवसा पुर्वी सुध्दा ज्या इव्हन दो हॉस्पीटल झोटे आहेत ५-१० बेडचे आहेत परंतु ५-१० बेड तर ५-१० बेड त्यांच्यात जे काय त्यांच्या अटीशर्तीत काय आहे ते टाकून त्यांच्यात जी काही प्रसंगी कमतर्ता असेल त्या आपण फुलफील करुन घेत आहोत. आणि त्यानुसार त्याही ऑस्पीटल ३९९ जवळपास ४०० बेडचीही आपण परवाही परवानगी दिलेली आहे. एवढेच नव्हे आजपर्यंत आपण ७०-८० सिलेंडर प्राईव्हेट हॉस्पीटलला देऊन आपल्या लोकांचे जीव वाचविलेले आहेत. उपमहापौर साहेबांना माहित आहे महापौर मॅडमला माहित आहे आपल्या अलमोस्ट ऑल भौतेक पदाधिकाऱ्यांना माहित आहे. ज्या ज्या वेळी प्राईव्हेट हॉस्पीटलने मागणी केली आपण प्रसंगी आपल्याकडे ५०-६० सिलेंडर असताना सुध्दा ते ५-५, १०-१० दिले. आणि ऑक्सीजनच्या बाबतीत जर म्हटले तर परत परत मी तेच विषय काढतो, तुम्हाला वाटते ते रिपीट होत आहे ऑक्सीजनसाठी अतिशय आपण सेंन्सीटीव्ह आहोत. ज्या ठिकाणी दोन अधिकाऱ्यांनी काम करायला पाहिजे पण कुठलाही पेशंटला ह्या शहरात दगाफटका होऊ नये जीविताला धोका होऊ नये म्हणून आपण १०-१० लोक करतोय. मी व्यक्तिश: जातीने किती वाजता शेवटचा टाईम फुल होत नाही तोपर्यंत आम्ही ह्यातले एकही झोपत नाही. राहिला प्रशन इतर फॅसिलीटी वाढविण्याचा २५० पेशंट आय.सी.यु. चे आणि ऑक्सीजन बेड तयार आहेत. परंतु ऑक्सीजनचा विषय हा दोन तीन दिवसात सुटला बेड आज जरी ऑक्सीजनचा प्रशन सुटला तर लगेल २५० बेड वाढतात. अजुन एक मुद्दा येतो की पेशंट चेक करण्याचा उदा. उद्या परवा आम्ही टेंभा हॉस्पीटल, प्रमोद महाजन हॉस्पीटलचे टायट्रेशन आपले एम.ओ.एच. जाधव डॉक्टर, चकोर, बच्छाव आपली टीम स्व:त जरी दुसऱ्याला आऊट सोर्सिंग जरी केला असेल तरी त्यांच्याकडे जावून टायट्रेशन करतो. त्याठिकाणचे ऑक्सीजन मॅनेजमेंट करतो आणि त्यानंतर असे जे पेशंट आहेत जे पेशंट स्टेबल आहेत ज्यांना ऑक्सीजनची किंवा आय.सी.यु.ची गरज नाही ज्यांना आय.सी.यु. ची गरज नाही त्यांना ऑक्सीजनमध्ये आणतो. आणि ज्यांना ऑक्सीजनची गरज नाही त्यांना आपण सी.सी.सी. मध्ये नेतो. अशा केसमध्ये आपण डेली १५ जागा २० जागा ४० जागा जशा जशा जागा रिक्त होतात तशा तशा आपण ॲडमिशन देतो. कारण त्याच्या मागचा उद्देश असा जो पेशंट स्टेबल आहे तो पेशंट स्टेबल

असुन साध्या बेडवर त्याला ट्रीटमेंट चालु शकते किंवा आय.सी.यु. च्या ऐवजी ऑक्सीजनची ट्रीटमेंट चालु शकते त्याची आपण रोज खातरजमा करतो. त्याठिकाणी आपण तिही काळजी घेतो. आणि ज्या ज्या फॅसिलीटी अजुन वाढविणे आहे फॅसिलीटी वाढविण्याच्या बाबतीत आपल्या बांधकाम विभागाच्या सोबत आपण प्रत्येक्ष स्थळ पाहणी केलेली आहे. सगळ्या फॅसिलीटी वर्कआऊट करून ठेवलेल्या आहेत. येत्या ८-१० दिवसात जेवढे बेड लागतील तेही बेड वाढणार आहेत. त्यानंतर हेजे फॅसिलीटी आपण वाढवू कुठल्याही पेशंटला अर्धा रात्री कुठेही जावे लागणार नाही ह्याच्यासाठी हे प्रशासन कटीबद्द्ध आहे. ज्या ज्या ठिकाणी आपण बेड वाढवणार आहेत जे आपण शॉर्टलिस्ट केलेले आहेत त्या त्या ठिकाणी आपण अजुन बेड वाढवणार आहोत. आप्पासाहेब धर्माधिकारीमध्ये अजुन आपण १०० बेड वाढवतोय. मिनाताई ठाकरे मध्ये १६५ बेड वाढवतोय. कोविड केअर सेंटर सोनम बिल्डरकडे आपण ५२ बेड वाढवतोय. डेल्टा गार्डनमध्ये कालही आम्ही पाहणी केलेली आहे. ८६२ बेड आपण तयार आहेत. एस.के. हाईट आणि काशिमीरा स्टुडीओ ह्या ठिकाणची पण स्थळ पाहणी केलेली आहे. एस.के. हाईट्स मध्ये ३०० बेड केलेले आहेत. काशिमीरा स्टुडिओ मध्ये ३२० बेड आहेत. त्याच प्रमाणे महेश्वरी बँकेट हॉल त्याठिकाणी २०० बेडची व्यवस्था होऊ शकते. इतक्या ठिकाणची बाकी सज्जता आहे. सज्जता सुरु आहे. त्यामुळे आज आपण त्यांना जी ट्रीटमेंट देत आहोत त्याच्यात आणखीन वाढ करत आहोत आणि पुढे वाढ होत राहणार आहे. हा जो तात्पुरत्या स्वरुवात पॅनिंगनेस आहे हा तात्पुरता आहे. ही सगळी गोष्ट व्यवस्थित होणार आहे. आता लसिकरणाच्या बाबतीत येतो आतापर्यंत आपल्याला एकुण लसीकरणासाठी १ लाख ४७ हजार डोस प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी आपण आतापर्यंत आपण १ लाख ३३ हजार ८०६ डोस व्हॅक्सीनचे दिलेले आहेत. एम.एम.आर. रिझन मध्ये एम.एम.आर.डी.ऐ. मध्ये सगळ्यात जास्त लसिकरण हे मिरा भाईंदर महापालिकेने केलेले आहे. आणि लसिकरणाचे काम सरासरी आपण ४ ते ५ , ५ हजार लोकांना आपण रोज लसिकरण करत आहोत. आणखीन ४८ खाजगी रुग्नालयात लसिकरणासाठी वॉर्ड व्हाईज अशी मागणी आपण शासनाकडे केलेली आहे. कॉन्टॅक्ट ट्रेसिंग कन्टेनमेंट झोन हॉट्स पॉट ह्यासाठी रोज आपण सुरु आहे. अजुन दंडात्मक कारवाई मास्क वापरत नाहीत किंवा काही करत नाहीत. आतापर्यंत प्रशासनाने १९ लाख ६३ हजार रुपये दंड वसुल केलेला आहे. त्याच्यावर आपण २३ पथके नेमलेली आहेत. सोबत पोलिसांचे पथक पण आपल्या बरोबर असते. जागोजागी जावून आपण त्याठिकाणचे कारर्वाया करत असतो. आणि सकाळी ७ ते ११ हे काल जे आपण लॉकडाऊन सुरु केले आहे हे महाराष्ट्रात सगळ्यात अगोदर केले आहे. ह्याची कॉपी मुंख्यमंत्री किंवा इतर मंत्र्यांकडे जात असते. त्या धर्तीवर महाराष्ट्रात ७ ते ११ हेच आयडीयल बरोबर आहे म्हणून ह्याच धर्तीवर महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी मिरा भाईंदरच्या धर्तीवर करा असे शासनाकडून निर्देश गेलेले आहेत. आपल्याकडची जी उपाय योजना आहे ती आपण चांगल्या पध्दतीने करत आहोत. ज्या ज्या आपल्या सुचना आहेत जी जी कमतर्ता असेल तेही आपण कमतर्ता दुर करुन आणखीन जास्तीत जास्त चांगले करण्यासाठी आपण प्रयत्नशिल आहोत. बाकी रुग्नवाहीकेच्या बाबतीत काही सुचना आल्या वॉर रुमच्या बाबतीत काही आले त्याबाबतही आपण जे जे कमतर्ता आहे ती दुर करणार आहोत. त्यानंतर ब्लड प्लाझमा, ब्लड प्लाझमाच्या बाबतीत बोलायचे झाले तर आपण इव्हनदो तुम्हालाही सगळ्यांना अपीन आहे जर कोणाकडे चांगल्या ऐन्जीओज असतील ज्याचा मिसयुज होणार नाही तर अशा लोकांना आपण हे करत आहेत. आपण त्या ब्लड बँकेला दिले आहे त्याचा नंबर दिलेला आहे आणि पेशंटला आपण संपर्क साधतो. परंतू तुम्हाला सगळ्यांना एक अपील आहे एक विनंती आहे आपल्या मार्फत सुध्दा पेशंटला सांगितले तर अजुन डोनेशन होऊ शकते. कारण पेशंट प्लाझमा द्यायला पुढे विलिंगला येऊ शकत नाही. येत नाहीत. फोन उचलत नाहीत टाळाटाळ करतात. देतो करतो सांगतात पण प्लाझमा देण्याचे प्रमाण हे कमी आहे. तर लोक जागृतीसाठी आपली तिथे मदत व्हावी अशी विनंती आहे. ती आपल्या मार्फत झाली तर आणखीन चांगले होईल. आणखीन त्यात ज्या ज्या सुधारणा करणे शक्य आहे त्या त्या आपण

करणार आहोत. ह्या शिवाय जे जे सुचना ज्या ज्या सदस्यांच्या आलेल्या आहेत ऑक्सीजन बेडच्या आल्या आहेत, रियल टाईम बोर्ड चे आले आहेत, रेमडेसिवीरचे, ऑक्सीजनचे आहेत, ज्या सर्व सदस्यांच्या सुचना मी स्व:त लिहून घेतलेल्या आहेत. त्या त्या सुचनांची अंमलबजावणी तात्काळ करणार आहे. जे अधिकारी कर्मचारी कामात कचुराई करतील त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात प्रशासनाच्या वतीने मी तुम्हाला गॅरंटी देतो की कारवाई करण्यात मी कुठलिही कच खाणार नाही. थँक्यु.

मा. महापौर :-

उपमहापौर साहेब बोला.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम, आमचे प्रश्न किंवा कुठल्याही लोकप्रतिनिधीने प्रश्न मांडले होते, आणि जी व्यथा मांडली होती परत मी बोलू इच्छातो ह्या व्यथा कोणाच्या बाबत किंवा व्यक्तीगत बाबत तक्रार नव्हती. ती त्यांची व्यथा ह्या साठी होती की त्यांच्या घरी किंवा त्यांचा कोणी नातेवाईक किंवा त्यांच्या प्रभागामध्ये कुठला त्यांचा नागरीक त्यांचा तो अडचणीमध्ये आलेला माणुस तो हॉस्पीटलमध्ये गेलेला होता किंवा त्याला अडचणीत आला होता ती व्यथा ईथे मांडलेली होती. आता आयुक्त महोदयने काय सांगिते महापौर मॅडम, जो सवाल दिया था उसका तो मेक्झीमम क्लेरिफिकेशन नही आया है उसके अंदर मेक्झीमम आयुक्त महोदयने क्या बताया जो कमतर्ता है आणि ज्या सुचना मांडल्या आहेत त्याच्यावर आम्ही लक्ष देऊ. आणि त्याच्यावरती आम्ही कामे करु. मेरा और बाकी लोगो के बहूत ऐसे सवाल थे उसका कोई क्लेरिफिकेशन नही आया और सबसे बढी बात महापौर मॅडम इसके उपर तहकुब कि गई थी और यह तहकुब के लिये ध्रुवकिशोर पाटीलजी ने बात रखी थी और अपना ठराव रखा था । क्लेरीफिकेशन बहूत सारे सवाल के थे मै खाली एक बेस्ट ऐक्झाम दे देता हू महापौर मॅडम मैने इतने सवाल किये थे उसमे से सिर्फ एकही सवालका करता हूँ, उसका क्लेरिफिकेशन आया नही, मैने कहा के जब रेमडेसिवीर इंजेक्शन महाराष्ट्र शासन की तरफ से फुड अँड ड्रग्स विभाग की तरफ से कलेक्टर की तरफ से हमे यहा दिया जाता है तो क्यो महानगरपालिकाके डॉक्टर प्रिस्क्रीप्शन मै देते है की जाके आप दवाई लेके आईये । उका कोई खुलासा नही आया । तो वही मै कह रहा हूँ महापौर मॅडम अगली बार यह सुचना की जाये की अगली बार जब महासभा अब यह आप तहकुब कर रहे हो मॅडम यह आपका अधिकार है कोई आप पे दबाव नही डाल सकता है लेकीन अगली बार हमने यह नही कहा की प्रशासन से जवाब मत लिजीऐ लिजीऐ ना हम चाहते है सभी लोग चाहते है सब लोकप्रतिनिधी को जवाब चाहिऐ लेकीन पुरा जवाब लेके आवे । कमतर्ता है हम देखते है बताते है, करते है ऐसा नही चाहिऐ । यह कोविडका विषय है यह शहर के लिये विषय है । इसको आप हलके मै मत लो । थोडा भी हलके मे मत लो । बाकी आपको सब चिजे पडी है यहापे क्लेरिफिकेशन यहा पे ग्राऊंड लेव्हल पे काम चाहिये । हो सकता है आयुक्त महोदय यहापे काम कर रहे हो उनके निचेका अधिकारी काम नही कर रहे हो तो उसका कोण जबाबदार? एक छोटासा डॅशबोर्ड के लिये जवाब नही आया । क्या हम इसके लिये यहा बैठे है? की खाली बस यहा लोकप्रतिनिधी सवाल करे और आप खाली जवाब दो क्या वहा धर्तीपर काम नही होगा ग्राऊंड लेव्हल पे यह काम नही होगा खाली यहा जवाब सवाल ही चलेगा क्या महापौर का अधिकार नही है महापौर मॅडम, की आपके उपर प्रेशर किया जा रहा है लोकप्रतिनिधी पुछते है या सदस्य महोदय यह नही करना चाहिऐ यह नही करना चाहिऐ यह महापौर को बतायेंगे की नही करना चाहिये या नही करना चाहिऐ मुझे दु:ख हो रहा है । अगर यह कोविड का विषय है तो कोविड के बारे मै शहर के हित मै काम होना चाहिये फिर चाहे मै आयुक्त महोदय से कहना चाहता हूँ महापौर मॅडम से मै कहना चाहता हूँ की मैने आप से निवेदन नही किया चाहे जोभी लोकप्रतिनिधी हो चाहे किसी भी पक्ष का हो उसके अंदर समावेश किजीऐ । हमने डांगे साहब सेभी कहा था जब तत्कालिन आयुक्त थे राठोड साहब हमने उनकोभी कहा था और

आप सेभी कहा था पाच छे दिन पहले । सर लोकप्रतिनिधीका समावेश किजीऐ पता चलेगा ओ काम कर रहे है या नही कर रहे है । लेकीन क्या हम मानते है आप काम कर रहे है लेकीन साथ मै टीम बनाईये छोडीये ना. लेकीन कमतरता है वो करके लेंगे तो कहा चलेगा । कहातक चलेगा, हमने क्या आरोप प्रतिरोप किया हमने क्या ऑक्सीजन की बात कही नही की हमने क्या रेमडेसिवीरकी बात की क्यो नही आई हमेन नही कही मैने कहा की क्यो लिख के दे रहे हो हमने ऑक्सीजन पे आरोप प्रतिआरोप नही किया प्रशासन से लेना चाहिये राज्य सरकार से लेना चाहिये हमने किया ओ आरोप प्रतिआरोप । हमारे सदस्य महोदय कह रहे है की मै दो बजे उठके फोन करती हू तीन बजेभी उठ के फोन करती हूँ मुझे जवाब आता है और मैरा काम होता है उनका काम होता है । मै भगवान से प्रार्थना करुंगा की हमारे महानगरपालिका के जितने भी सदस्य है भगवान करे ऐसा ही हो की आयुक्त महोदय प्रशासन पुरा उनका कभी कामहीना पडे और आपको दो बजे तीन बजे सभी सदस्यो के साथ मै घटना हो कभी जरुरत भीना पडे । मै पुरे तेह दिल से शुक्रगुजार करना चाहूँगा । और महापौर मॅडम यह आपका अधिकार है । धंन्यवाद ।

मा. महापौर :-

मिरा भाईंदर शहरात प्रशासन कोविड संदर्भात जे काम काज करत आहेत हे समाधानकारक नसल्याचे आज ह्या ठिकाणी नगरसेवकांनी आपआपल्या भाषनातुन स्पष्ट केलेले आहे. मिरा भाईंदर शहरामध्ये आज ऑक्सीजनची कमतर्ता रेमडेसिवीर इंजेक्शनची कमतर्ता किंवा प्रशासनाने जे अधिकाऱ्यांना आयुक्तांनी ज्यांना अधिकारी नेमलेले आहेत ज्यांना कामकाज वाटून दिलेले आहे ते अधिकारी कुठेतरी कामामध्ये कमी पडत आहेत अशा पध्दतीचे एक चित्र शहरामध्ये दिसत आहे. आणि मृत्युदर हा वाढतच चाललेला आहे. तसेच आज पेशंटची संख्या कोरोना पेशंटची संख्या ही वाढत आहे. आणि अशा परिस्थितीत आजची ही महासभा आपण इथे लावलेली आहे. इतर विषयही महासभेमध्ये आहेत तेही फार महत्वाचे आहेत परंतु सध्या सर्वात महत्वाचा विषय हा कोविडचा आहे आणि अशा परिस्थितीमध्ये नगरसेवकांनी ज्या ज्या सुचना आजच्या ह्या सभेमध्ये केलेले आहे त्या सर्व सुचनांची अंमलबजावणी प्रशासनाच्या माध्यमातुन करण्यात यावी. आणि ज्या ज्या ठिकाणी प्रशासन कमी पडत आहे कुठे आपल्याला त्रास होत आहे किंवा आपल्याला कुठल्या पध्दतीने कामकाज सुधारले पाहिजे याकडे आपण जातीने लक्ष द्यावे. तसेच मा. मुख्यमंत्री , मा जिल्हाधिकारी ह्यांच्याशी आपण सतत संपर्क साधावा संवाद साधावा जेणेकरुन मिरा भाईंदर शहरामध्ये ऑक्सीजनची कमतरता भासनार नाही, रेमडेसिवीरची कमतर्ता भासणार नाही आणि ज्याठिकाणी खरोखरच पेशंटला रेमडेसिवीरची गरज नाही परंतु उगाचच प्रिस्क्रीप्शन्स लिहून त्या नागरीकांच्या त्या नातेवाईकांना हाईराण केले जाते तर अशा पध्दतीचे चित्र जे शहरामध्ये हॉस्पीटलच्या माध्यमातुन निर्माण केलेले आहे हे कुठेतरी थांबले पाहिजे म्हणून प्रशासनाने आयुक्ताने संबंधित सर्व हॉस्पीटलच्या डॉक्टर बरोबर चर्चा करुन तात्काळ ह्या बाबत योग्य तो निर्णय प्रशासनाच्या माध्यमातुन घेतला पाहिजे. महापालिकेच्या सर्व हॉस्पीटलमध्ये महापालिकेच्या खाटा रिझर्व्ह ठेवल्या पाहिजेत, जेनेकरुन गौर गरीब नागरीकांना लगेचच खाट मिळू शकेल. कोरोना पेशंटला लगेचच बेड मिळू शकतील. जोपर्यंत प्रशासन ह्या सर्व विषयावरती चांगलया पध्दतीने आणि समाधान कारक अंमलबजावणी करणार नाही तोपर्यंत ही सभा तहकुब करण्यात येत आहे. याची पुढील सभा समाधानकारक कामकाज झाल्या नंतरच लावण्यात येईल.

सभा तहकुबी ठराव क्र. ०१ :-

कोविडचा प्रादुर्भाव शहरात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर पसरत असून महापालिकेच्या सर्व सन्मा. सदस्यांनी कोविड साथरोग विषयाबाबत प्रशासनाच्या गैरव्यवस्थेबाबत व कार्यपध्दतीबाबत तीव्र भावना व्यक्त केलेल्या असुन वृत्तपत्रातही प्रशासनाच्या गलथान कारभारबाबत उदाहरणासहित अनेक बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत.

यावरुन कोविड साथ रोग रोखणेकामी रुग्णांवर उपचार करणेकरीता केलेल्या उपाययोजनेमध्ये गैरप्रकार व निष्काळजीपणा झाल्याचे दिसून येत आहे. महापालिकेतर्फे करोडो रुपये खर्च करुनही सध्या रुग्णांवर केल्या जाणाऱ्या उपचार पध्दती / साधन सामग्री खरेदी करणे, निविदा मागविणे त्यास मंजुरी देणे इ. गैरप्रकार झाल्याचे निर्दशनास आल्याने त्याची चौकशी करणेकरीता मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली सर्व पक्षीय गटनेते व पदाधिकारी यांची समिती गठीत करावी.

तसेच मा. स्थायी समितीने देखील या विषयाबाबत समिती गठीत केली आहे त्या समितीचाही मा.महापौरांनी केलेल्या समितीमध्ये समाविष्ट करुन त्या समितीने सर्वप्रकारची माहिती घेवून झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करुन संपूर्ण अहवाल मा. महासभेमध्ये सादर करावा तोपर्यंत ही मा. महासभा तहकुब करावी.

तसेच शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या तीन उपायुक्तांपैकी एका उपायुक्तांना महापालिकेच्या सेवेतून मुक्त करुन मनपाच्या आस्थापनेवरील वरीष्ठ सहाय्य आयुक्तांस उपायुक्त पदी नियुक्त करावे असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका